# सृजन

डिसेंबर २०२२ ते एप्रिल २०२३
(डिजीटल अंक)









## महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ.पी. अन्बलगन यांची भुसावळ प्रकल्पास भेट





महानिर्मितीच्या चौथ्या ६६० मेगावॅट प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून या प्रकल्पविषयक कामांचा वेग अधिक वाढवावा, असे निर्देश महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन यांनी महानिर्मिती आणि मेसर्स. भेल अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या ६६० मेगावॅट वीज प्रकल्पाला भेट दिली. त्यांचे प्रमुख उपस्थितीत जी.टी.आर. बस डक्ट उभारणी, मेन कंट्रोल रूम, बॉयलर फीड पंप, कॉम्प्रेसर, एफ.डी.फॅन यांचे चाचणी कार्यान्वयन, वॅगन टिपलर उभारणी कामांचा प्रारंभ करण्यात आला.

त्यावेळी त्यांचेसोबत महानिर्मितीचे मा. संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे, मा. कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षितता) डॉ. नितीन वाघ, मा. मुख्य अभियंते सर्वश्री. विवेक रोकडे, मोहन आव्हाड, पंकज नागदेवते, दत्तात्रय साळुंखे, स्थापत्य सल्लागार श्री. ज्ञानोबा मुंडे, उप मुख्य अभियंता श्री. संजय कुऱ्हाडे तर भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्री. अरुमोय मुखर्जी, महाव्यवस्थापक श्री. सी.के. निमेश, प्रकल्प संचालक श्री. जवादे तसेच मेसर्स भेल च्या सब एजन्सीचे सर्व वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी, वीज प्रकल्पाच्या सद्यस्थितीवर आधारित सादरीकरण सादर करण्यात आले. यानंतर मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी भुसावळ ५०० मेगावॅट संच क्रमांक ४ व ५ ला भेट दिली आणि अभियंत्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला.

अभियंत्यांशी संवाद साधताना डॉ.पी. अन्बलगन म्हणाले की, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी प्रत्येकाने कार्यक्षमतेत वाढ करावी, रास्त दरात महत्तम वीज उत्पादनाचे ध्येय उराशी बाळगावे, नवनवीन संकल्पना राबवणे सोबतच वीज क्षेत्रातील अद्ययावत माहिती आणि ज्ञानार्जन करणे तितकेच गरजेचे आहे. औष्णिक वीज निर्मिती हे आपले बलस्थान असल्याने जीव लावून काम करा, वीज उत्पादनाच्या राष्ट्रीय कार्यात आपण खारीचा वाटा उचलतोय याचा सार्थ अभिमान बाळगला पाहिजे. आपल्या संचांचा भारांक ८० ते ९० टक्के ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करा. महानिर्मितीमध्ये चंद्रपूर आणि कोराडी नंतर आता भुसावळ वीज केंद्र हे तिसरे महत्वाचे औष्णिक केंद्र ठरणार आहे. त्यामुळे प्रकल्पविषयक कामांचा दर्जा कायम ठेवून पावसाळ्यापूर्वी सर्व कामे सूक्ष्म नियोजन पद्धतीने करावीत, असे त्यांनी सांगितले.

प्रकल्पविषयक प्रगतीपथावरच्या कामांची माहिती तसेच दैनंदिन अडचणींवर मा. मुख्य अभियंता श्री. विवेक रोकडे यांनी प्रकाश टाकला, तर मेसर्स भेल च्या अधिकाऱ्यांनी संबंधित सब एजन्सी सोबत समन्वय बैठका घेऊन कामे नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावा असे मा. संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे यांनी निर्देश दिले.

भेटीदरम्यान उप मुख्य अभियंते सर्वश्री. आर.एम. दुथडे, संतोष वकरे, मनोहर तायडे, अधीक्षक अभियंते सर्वश्री. महेश महाजन, किशोर शिरभैय्ये, मनिष बेडेकर, योगेश इंगळे, पराग आंधे, सुमेध मेश्राम, सुनील पांढरपट्टे, महेंद्र पचलोरे, अतुल पवार, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम, कल्याण अधिकारी पंकज सनेर, सुधाकर वासुदेव, कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ राजेश चिव्हाणे, सीमा महाले वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) प्रामुख्याने उपस्थित होते.





# नम्र निवेदन....

पावसाळ्यात विजेची मागणी कमी असल्याने वीज उत्पादन संचांची देखभाल-दुरुस्ती रखरखाव स्वरुपाची कामे करण्यात येतात. साधारणत: ऑक्टोबरपासून तर जून महिन्यापर्यंतच्या आठ महिन्यात सण उत्सव, ऑक्टोबर हिट, दीपोत्सव आणि त्यानंतर राज्यभरात कडाक्याच्या थंडीला सुरुवात होते, त्यानंतर संक्रांत, गुढीपाडवा, होळी नंतर उन्हाळ्याला सुरुवात होऊन विजेची मागणी वाढतच जाते. या काळात महत्तम वीज उत्पादनाचे महानिर्मितीचे नियोजन असते.

एकूण काय तर या आठ महिन्यात खडतर परिश्रम करण्याकरिता महानिर्मितीच्या मनुष्यबळाला आणि कुटुंबियांना सशक्त वातावरणाची गरज असते आणि ती गरज खऱ्या अर्थाने सांस्कृतिक, क्रीडा, मनोरंजनपर कार्यक्रमांतून होत असते. ज्यामध्ये वर्धापन दिन, सुरक्षा सप्ताह, प्रशिक्षण कार्यक्रम, महिला दिन, आंतरविद्युत केंद्र क्रीडा स्पर्धा, हॅप्पी स्ट्रीट, रक्तदान शिबिर इत्यादि सारख्या कार्यक्रमांचे आयोजन करुन महानिर्मिती परिवाराला चैतन्यमय करण्याची परंपरा आहे. त्याचाच परिपाक म्हणून महानिर्मिती परिवाराच्या सर्वांगीण विकासासोबत वीज उत्पादनात देखील याचा सकारात्मक परिणाम दिसून येतो. 'सृजन' या गृहपत्रिकेच्या माध्यमातून राज्यभरातील घडामोडी महानिर्मितीच्या मनुष्यबळ आणि परिवारापर्यंत जात असतात, हे विशेष.

मात्र काही तांत्रिक अडचणींमुळे डिसेंबर २०२२ ते एप्रिल २०२३ पर्यंत 'सृजन' गृहपत्रिका प्रकाशित झाली नाही. असे असतानाही राज्यभरातून सातत्याने घडामोडी / बातम्या / माहितीचा ओघ सुरुच होता. त्यामुळे वाचकहित आणि भावनांचा आदर लक्षात घेऊन डिसेंबर २०२२ - एप्रिल २०२३ हा 'सृजन' अंक डिजीटल स्वरुपात काढण्यात आला आहे, जेणेकरुन वाचकांना माहिती उपलब्ध होईल, त्याचा आपण सहृदयी स्वीकार करावा, अशी नम्र विनंती करीत आहे.

या अंकात विशेषत: मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे क्षेत्रीय दौरे, भेटी तसेच चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राने कोविडमध्ये अंतरलेल्या वीजयोध्दांच्या स्मरणार्थ उभारलेले "निर्भय शिल्प" निरंतर राष्ट्रभावना जागृत ठेवण्याचे आणि निर्भयतेची प्रेरणा देणारे आहे. तसेच अभिनव अशा 'मिशन समर्थ' या हरित ऊर्जाविषयक कार्यक्रमाची माहिती या अंकात समाविष्ट करण्यात आली आहे.

मे २०२३ ते ऑक्टोबर २०२३ हा 'सृजन' अंक नेहमीप्रमाणे लवकरच प्रसिध्द होणार आहे. आपले प्रेम आणि सहकार्य निरंतर लाभो, ही अपेक्षा व्यक्त करतो.

तसदीबद्दल क्षमस्व!

– यशवंत मोहिते

# THE NATIONAL SOLAR ENERGY FEDERATION OF INDIA (NSEFI) HOSTED A CONFERENCE ON "WOMEN IN ENERGY: EMPOWERING INDIA"






**On November 21, 2022,** The National Solar Energy Federation of India (NSEFI) hosted a conference on "Women in Energy : Empowering India". The NSEFT event provided a venue for bringing together female stakeholders from various fields, positions and sectors to gain a comprehensive understanding of how the renewable energy industry provides a forum on talking about women's involvement.

No energy is bigger than Women's energy," said Pranav R Mehta, Chairman of NSEFI, in his opening remarks. "Women play an important role in all sectors to bring about the transformation.

Hon'ble Nirmala Sitharaman, Minister of Finance and Corporate Affairs for the Government of India, graced the occasion. In her inaugural speech, the finance minister noted that the nation's attention has switched from women's development to women-led development.

"Women should be in the Center of Energy Transition and drive India's Renewable Energy Journey Growth Story" she said. To do this, the government and many groups are working round the clock to include women in every important sector and to bring about systemic reforms to society's means of subsistence that are focused on maximising women's access to energy, education, and ease of doing business.

The Women in Solar Energy (WISE) portal was also inaugurated by the honourable Finance Minister. All women seeking direction to work in the energy field and investigating job opportunities can use the Women in Solar Energy Portal as a resource. Leading female professionals in the solar energy industry are also included on this portal as mentors who will guide women who want to pursue professions in the solar energy business. The honourable Finance Minister also spoke to women entrepreneurs and beneficiaries in the energy sector who are active in rural communities and spreading the energy transition there.

Dr. Vandana Kumar, Additional Secretary of the Rajya Sabha and former Additional Secretary of the Ministry of New and Renewable Energy, as well as Mrs, Suman Sharma, Managing Director of Solar Energy Co-operation of India Ltd., were also guest speakers at the event.

A team of Seven (07) women Engineers / Officers from RE-P&P department and other dept of Mahagenco attended the event and represented Mahagenco at the forum. They also interacted with women professionals from other companies and other arena like farmers using Solar Energy in farming to discuss about Mahagenco's contribution in the Renewable Energy sector.

The Mahagenco team discussed various issues faced by Mahagenco during and after land acquisition for solar projects until its implementation, like local hindrances and post-implementation problems in Chief Minister Agriculture Feeder Scheme projects related to grid failure and trippings associated with 11 KV evacuation. They also requested the policy makers in the forum to amend policies regarding evacuation levels for 5 MW and above projects so that these problems could be resolved.

During the deliberations, Dr. Vandana Kumar, Additional Secretary of the Rajya Sabha keenly interacted on "One Nation, One Net Metering Policy" on the lines of "One Sun, One Grid" agenda to promote Solar rooftops in India. This event provided a venue for bringing together female stakeholders from various fields, positions, and sectors to gain a comprehensive understanding of how the renewable energy industry provides a forum on talking about women's involvement.

The conference saw a wide women participation from all the stakeholders in the energy sector (About 180 delegates and speakers). The insights from agricultural women working tirelessly in the sector was the highlight of the event. The view of the policy makers in the 75th year of independent India about women's contribution in energy was commendable and has put lot of expectations in terms of women led development in the RE sector.

## पारस औष्णिक वीज केंद्र येथे विद्युत सुरक्षा सप्ताह २०२३ निमित्त विविध जनजागृतीपर कार्यक्रम संपन्न







पारस औष्णिक वीज केंद्र येथे विद्युत सुरक्षा सप्ताह २०२३ चे औचित्य साधून केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर व उप मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. धनंजय पंधाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.


दिनांक १९ जानेवारी २०२३ ते २७ जानेवारी २०२३ या दरम्यान हा सप्ताह साजरा करताना दिनांक १९ जानेवारी २०२३ रोजी मुख्य अभियंता यांच्या हस्ते सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच स्थानिक स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे शालेय विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षासंबंधी जागरूकता निर्माण करणे, ELCB/RCCB चा वापर न्यूट्रल आणि अर्थिंग यांच्या योग्य वापरासंबंधी कंत्राटी कामगारांसमवेत सर्व कर्मचारी वर्गाला माहिती देणे, आग प्रतिबंधक प्रात्यक्षिके आणि वेगवेगळ्या प्रकारचे आग नियंत्रक सिलेंडरचा वापर, उच्च व मध्यम वीज दाबाच्या उपकरणांच्या देखभालीकरिता ते सुरक्षितपणे कसे हाताळावे आणि वसाहत परिसरातील उद्वाहकांमध्ये वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर अडकलेल्या व्यक्तींना सुखरूप कसे बाहेर काढावे यासंबंधी माहिती व प्रात्यक्षिके असे विविध प्रकारचे कार्यक्रम संपूर्ण आठवडाभर घेण्यात आले.


दिनांक १७ जानेवारी २०२३ रोजी विद्युत सुरक्षा सप्ताह २०२३ च्या समारोपीय कार्यक्रमाला मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालय पारसदीप येथे प्रमुख उपस्थिती विद्युत निरीक्षक अकोला श्री. श्रीकांत बनसोड आणि उद्वाहक निरीक्षक अकोला सुप्रिया गोगले हे प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून हजर होते आणि विद्युत सुरक्षितता व उद्वाहक सुरक्षितता या विषयांवर अत्यंत उपयोगी अशी माहिती देत उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी, कामगार, कंत्राटी कामगार आणि शिकाऊ प्रशिक्षणार्थी उमेदवार यांचे अत्यंत उत्तम प्रबोधन केले.

स्वत:च्या घरापासून सुरु होणारी विद्युत सुरक्षा ही कितपत महत्वाची असून विद्युत अपघात टाळता येऊन एखाद्या व्यक्तीचा जीव कसा सुखरूप ठेवता येईल याबाबत वसाहतीतील नागरिकांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरासरण या सप्ताहात योग्यरित्या करण्यात आले.

समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. ताराचंद चांदेकर आणि केंद्रामार्फत घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती तसेच आभार प्रदर्शन अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. विशाल फिसके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उप कार्यकारी अभियंते सर्वश्री गोपाल चोपडे, श्रीकांत बोपले, प्रशांत पाटील, अभियंते सर्वश्री राजेश लंगोटे, उज्ज्वल चतरकर, प्रशांत घुगे, प्रमोद डोंगरे, मयुरेश कडू, साकेत वाडे, सुजित शार्दूल, पंकज अंबिलकर, स्वप्नील रामेकर, प्रशांत पाटील आणि विद्युत सुव्यवस्था व चाचणी विभागाचे चमू सर्वश्री जामनिक, साडे, साबळे हिवराळे, मुंडे, नागलवाडे, धुर्वे, गव्हाणे, बुटे आणि समस्त कर्मचारीवृंद यांनी व्यवस्थापन व परिश्रम घेतले.







## नाशिक प्रशिक्षण केंद्र येथे Management Development Programme (MDP) प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





सदर प्रशिक्षण सत्रामध्ये कार्यक्षम श्रवणतंत्र (Effective Listening Skill), भावभावनांचे व्यवस्थापन (Emotional Intelligence), कठीण परिस्थिती हाताळण्याचे तंत्र कौशल्य व निर्णयक्षमता (Conflict Handling Problem Solving & Decision Making), वेळेचे गणित आणि मौलिक नेतृत्वगुण (Time Management & Value based Leadership) या विषयांवर मानसोपचार तज्ञ श्रीमती. शोभा बलदोटा, शिक्षण तज्ञ श्री. विकास गौदारे, अनुभवी सल्लागार श्री. विजयकुमार मेंढा यांचे मार्गदर्शन लाभले. त्यावेळी उपस्थित महानिर्मितीचे प्रशिक्षणार्थी.

## महाराष्ट्र शासन रोजगार मेळावा २०२२ अंतर्गत महानिर्मितीच्या कोराडी औ.वि. केंद्रात उमेदवारांना नियुक्त पत्र





महाराष्ट्र शासन रोजगार मेळावा २०२२ अंतर्गत महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात दोन उमेदवारांना विभागीय आयुक्त, नागपुर यांच्या शुभहस्ते नियुक्त पत्र देण्यात आले. त्यामध्ये कोराडी औष्णिक विद्युत क्रेंद्राने नवनियुक्त उमेदवार श्रीमती. पद्मा विजय परतेती, सौ. प्रतिभा भानु बैस, यांना निम्नस्तर लिपीक या पदाचे नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये 'महासंकल्प' या रोजगार अभियानात एकुण ७५ हजार नियुक्ती पत्र देण्यात येत असून दि. ०३ नोव्हेंबर रोजी २०२२ रोजी राज्यभरात सुमारे २००० व्यक्तींना नियुक्ती पत्र देण्यात आले.

नागपूर विभागीय रोजगार मेळाव्यात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रादेशिक संचालक महावितरण, कोराडी वीज केंद्राचे तत्कालीन मुख्य अभियंता श्री. अभय हरणे, अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. अशोक भगत, प्रभारी उप महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. दिवाकर देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

## इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ अंतर्गत भुसावळ प्रकल्पात कंत्राटी कामगारांना मोफत भोजनाची सुविधा




इमारत व इतर बांधकाम कामगार कायदा १९९६ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ अंतर्गत भुसावळ प्रकल्प येथील नोंदणीकृत व अनोंदणीकृत कंत्राटी कामगारांना दोन वेळेच्या मोफत भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर सुविधा उपलब्ध करण्यासाठी श्री. विवेक रोकडे, मुख्य अभियंता (प्रकल्प), महानिर्मिती यांचेकडून सहाय्यक कामगार आयुक्त, जळगाव यांचेकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला होता. सदर पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे कंत्राटी कामगारांना दोन वेळेच्या मोफत भोजनाच्या सुविधेचा लाभ सुरू झाला.

कंत्राटी कामगारांना सदर सुविधा मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच त्यांच्या कार्यक्षमतेमध्ये देखील वृद्धी झाली. सकारात्मक वातावरणामुळे भुसावळ प्रकल्प उभारणीचे उद्दिष्ट विहित कालावधीत पूर्ण होणे शक्य होईल अशी प्रतिक्रिया समाजातील सर्व स्तरांमधून येत आहे. सदर योजना यशस्वी करण्यामध्ये सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, जळगाव, कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. श्री. सुधाकर वासुदेव, कल्याण अधिकारी, भुसावळ प्रकल्प यांनी सदर योजना सुरू करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यामुळे योजनेची अंमलबजावणी लवकरात लवकर करणे शक्य झाले. मुख्य अभियंता (भुसावळ प्रकल्प) श्री. विवेक रोकडे, उप मुख्य अभियंता (भुसावळ प्रकल्प) श्री. संतोष वकारे, सर्वश्री. अधीक्षक अभियंता, भुसावळ प्रकल्प यांचे मोलाचे मार्गदर्शन सदर योजना सुरू करण्यासाठी लाभले.

कंत्राटी कामगारांच्या नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करणेकरिता संबंधित कंत्राटदारांना मार्गदर्शन करणेसाठी महानिर्मिती व मे. भेल कंपनीचे प्रतिनिधी विशेष अभियान राबवित आहेत. सदर अभियानामुळे संबंधित कंत्राटी कामगारांना इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ अंतर्गत विविध योजनांचा लाभ घेणे शक्य होईल.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य अभियंते, अधिकारी, पुरुष व महिला कर्मचारीवृंद उपस्थित होते.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय संकल्प दिवस व सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित अभियंते, अधिकारी व पुरुष व महिला कर्मचारी यांना राष्ट्रीय एकता दिवसाची सामुहिकरित्या शपथ देण्यात आली.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे तत्कालीन मा. मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस तसेच वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी वृंद.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी आणि महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य अधिकारी / कर्मचारी वृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य अधिकारी, कर्मचारी वृंद.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता श्री. विराज चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित विभाग प्रमुख, पुरुष व महिला अभियंते, अधिकारी-कर्मचारी वृंद.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता श्री. विराज चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित विभाग प्रमुख, पुरुष व महिला अभियंते, अधिकारी-कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे तत्कालीन मा. मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य अधिकारी, कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता श्री. प्रशांत लोटके यांच्या अध्यक्षतेखाली महर्षि वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी वृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली महर्षि वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी वृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता श्री. अनिल काठोये यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, विभागप्रमुख, पुरुष व महिला कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. सुनिल लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, विभागप्रमुख, पुरुष व महिला कर्मचारी वृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य अधिकारी, पुरुष व महिला कर्मचारी वृंद.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संविधान साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी यांचेसोबत भारतीय संविधान उद्देशिकाचे सामुहिक वाचन करण्यात आले, त्याप्रसंगीचे हे छायाचित्र.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (५०० मेगावॅट) श्री. सुनिल रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती संपन्न झाली. त्यावेळी उपस्थित वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील मुख्य प्रवेशद्वार येथे मा. उप मुख्य अभियंता (२१० मेगावॅट) श्री. अरुण पेटकर यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन संपन्न झाला. त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य अधिकारी, कर्मचारी वृंद.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय संकल्प दिवस व सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित अभियंते, अधिकारी व पुरुष व महिला कर्मचारी यांना राष्ट्रीय एकता दिवसाची सामुहिकरित्या शपथ देण्यात आली.



पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारीवृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (२१० मेगावॅट) श्री. अरुण पेटकर यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा यांची जयंती संपन्न झाली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (५०० मेगावॅट) श्री. सुनिल रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (५०० मेगावॅट) श्री. सुनिल रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी वृंद.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. राजू घुगे यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी यांची जयंती संपन्न झाली, सदर जयंतीनिमित्त उपस्थित वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मता दिवसाची सामुहिक शपथ देण्यात आली.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. अतुल पवार यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित अन्य अभियंते, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांस राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली, त्याप्रसंगीचे हे छायाचित्र.

# महानिर्मितीतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त पद्मश्री डॉ. रविंद्र कोल्हे व पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांचा सन्मान

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतर्फे प्रकाशगड मुख्यालय येथे आज पद्मश्री. डॉ. रवींद्र कोल्हे व पद्मश्री. डॉ. स्मिता कोल्हे यांनी एका विशेष कार्यक्रमामध्ये उपस्थितांसोबत संवाद साधला. महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनानिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते कोल्हे दाम्पत्याचा यथोचित गौरव करण्यात आला. याप्रसंगी मा. संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, मा. संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, तत्कालीन मा. संचालक (खनिकर्म) श्री. दिवाकर गोखले प्रामुख्याने उपस्थित होते.

पद्मश्री. डॉ. रवींद्र कोल्हे यांनी आपले बालपण ते बैरागड हा प्रवास विषद करतांना सांगितले की, "मेळघाटातील आदिवासींच्या गरजांचा प्रथम अभ्यास केला आणि त्यावर शिक्षण घेत, शास्त्रीय दृष्टिकोनातून मार्ग काढत त्यांच्या गरजांची पूर्तता केली. यामध्ये आरोग्य सेवा, कृषी विकास, सामाजिक









प्रश्न, रस्ते, पाणी, वीज, सरकारी धान्य पुरवठा इत्यादी बाबींवर सुमारे ३२ वर्षे आयुष्य पणाला लावले". पुढे ते म्हणाले की, "आयुष्यामध्ये कितीही विपरीत घटना घडल्या तरी आपल्या मनावर कधीही हल्ला होऊ देऊ नका", हे अधोरेखित करताना त्यांनी आचार्य विनोबा भावे आणि महात्मा गांधी यांचा आदर्श ठेवत बैरागडची निवड करण्यामागील विशेष कारणे सांगितली.

मेळघाट या आदिवासी बहुल भागात आयुष्यभर निवास करायचा हे माहित असूनही आपण डॉ. रवींद्र कोल्हे यांना कसे स्वीकारले या प्रश्नाचे उत्तर देताना डॉ. स्मिता कोल्हे यांनी आपला शैक्षणिक संघर्ष आणि जोडीदाराची निवड हा सारा थक्क करणारा प्रवास अतिशय रंजक आणि मार्मिक पद्धतीने मांडला. शहरातील समृद्ध जीवनशैली ते ४० किलोमीटर चालत एक-एक लाकूड जमवत बांधलेली झोपडी हे स्वधर्माच्या शोधातून स्वीकारलेले होते, त्यामुळे वैयक्तिक हल्ले आणि आदिवासी बंधूंचे प्रेम हे दोन्ही पाहताना कधीही निराश झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या आत्मसन्मानाकरिता कोणतीही तडजोड करू नये, असे आवाहन केले. दोन तासाहून अधिक चाललेल्या या संवादाने सारे प्रेक्षागृह भारावून गेले होते.

महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन म्हणाले की, "डॉ. कोल्हे दाम्पत्याचे संघर्षमय समर्पित जीवनकार्य नवीन पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी असून प्रत्येकाने आपल्यापरीने समाजपयोगी कामात मदतीचा हात पुढे करणे गरजेचे आहे". मा. संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे यांनी 'पणती' या कवितेच्या माध्यमातून स्त्री शक्तीचे महत्व विषद केले तर मा. संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर यांनी महानिर्मितीमधील महिला कर्मचारी यांचे विशेष योगदान सांगताना कोराडी ३×६६० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या राष्ट्रार्पण सोहळ्याप्रसंगी महिला अभियंत्यांनी वीज उत्पादनाची दोरी सांभाळल्याचा गौरवाने उल्लेख केला. कार्यक्रमाची दमदार सुरुवात सौ. सोनाली चुंगडे यांनी केली तर मुलाखतीचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध सूत्रसंचालिका मानसी सोनटक्के यांनी केले. 'गतिमान प्रशासन मानव संसाधन' या ब्रीद वाक्यानुसार प्रास्ताविकातून मुख्य महाव्यस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत यांनी कोल्हे दांपत्याला विशेषत्वाने निमंत्रित करण्यामागची भूमिका मांडली तर आभार प्रदर्शन स्वप्निता राठोड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता मानव संसाधन विभाग तसेच मुख्यालयाच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला मा. कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदूरकर, मा. कार्यकारी संचालक श्री. पंकज नागदेवते (प्रभारी), मा. मुख्य अभियंते सर्वश्री. राजकुमार ओसवाल, गिरीश कुमरवार,चंद्रशेखर होळंबे, संजय कुऱ्हाडे, दत्तात्रय साळुंखे, धैर्यधर खोब्रागडे, मा. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. विजय चितलांगे, कंपनी सचिव श्री. राहुल दुबे, मुख्य विधी सल्लागार श्री. सुमंत कोल्हे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) महापारेषण श्री. सुधीर वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर तसेच अधिकारी आणि महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोयना धरण पायथा विद्युतगृहाचा ४०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला, याप्रसंगी अधीक्षक अभियंते सर्वश्री. बी.जी. कोष्टी, आर.के. कुमार, ए.डी. शिंदे व रेड्डी, कार्यकारी अभियंते सर्वश्री. डी.व्ही. पाटील, पी.एन. काळे तसेच अन्य अभियंते-कर्मचारी उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्राचा ६१वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न



दिनांक २५ ऑक्टोबर २०२२ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्राचा ६१वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून वीज केंद्रातील अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांकरिता विविध कार्यक्रमाचे व स्पर्धेचे दिनांक १६ ऑक्टोबर २०२२ ते ०१ नोव्हेंबर २०२२ दरम्यान आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहवर्धक वातावरण निर्मिती करण्यासाठी विविध स्पर्धा ज्यामध्ये चित्रकला, रांगोळी, सुदृढ बालक, घोषवाक्य, निबंध, प्रश्नमंजुषा, वेशभूषा स्पर्धा, मॅरेथॉन, नृत्य, विभाग स्वच्छता व सुरक्षितता स्पर्धा आयोजित करण्यात आले. तसेच, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, कुस्ती ब्रिज, कबड्डी, व्हॉलीबॉल व क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले. महिलांकरिता विशेष स्पर्धा ज्यामध्ये कार्यरत महिला व गृहिणी महिला यांच्याकरिता क्रिकेट व रस्सीखेच सामन्याचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याद्वारे इंधन बचत, घरगुती स्टोव्ह सुरक्षिततेबाबत गृहिणी, कर्मचाऱ्यांच्या वाहनांकरिता मोफत पी.यु.सी. कॅम्पचे आयोजन करण्यात आले व डॉ.श्री. आदित्य मापारी, अकोला यांच्याद्वारे हृदयरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन वसाहत दवाखाना येथे करण्यात आले.





दिनांक २५ ऑक्टोबर २०२२ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे द्वारपूजनाचा कार्यक्रम मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या हस्ते करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजनात अधिकारी/कर्मचारी यांची समिती स्थापन करण्यात आली व समितीच्या अध्यक्षस्थानी मा. मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर, उपाध्यक्ष उपमुख्य अभियंता श्री. शाम राठोड़, सल्लागार म्हणून अधीक्षक अभियंते सर्वश्री. आर.बी. गिरी, धनंजय पंधाडे, संजय कांबळे, राजेश गवार व कार्यक्रमाचे सचिव श्री. शब्दीरखान पठाण, सह-सचिव श्री. सतीश ठाकरे व श्री. पंकज तेलगोटे व इतर कर्मचारीवृंद सदस्यस्थानी होते.

या प्रसंगी पारस औष्णिक विद्युत केंद्राच्या वर्धापन दिनानिमित्त महानिर्मिती कंपनीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन, मा. संचालक (संचलन) श्री. संजय मारूडकर, मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - १) श्री. गिरीश कुमरवार, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) श्री. पंकज सपाटे, मा. कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. विठ्ठल खटारे, मा. कार्यकारी संचालक (कोळसा) श्री. राजेश पाटील व इतर महानिर्मिती परिवारातील मुख्य अभियंते / मुख्य महाव्यवस्थापक यांचे शुभेच्छा संदेश प्राप्त झाले.



# कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचा ४८वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न





दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजी कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील रंगमंच, मारोती मैदान येथे वर्धापन दिन मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला.

कोराडी वीज केंद्र हे भौगोलिक दृष्ट्या आणि नफा-तोट्याच्या दृष्टिकोनातून महानिर्मितीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. वीज उत्पादन विषयक सर्वांगाने कार्यक्षमता वाढीसाठी कार्यरत मनुष्यबळ आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी वसाहत परिसरात फ्री वायफाय सुविधा, स्विमिंग पूल, जिम्नॅशियम सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात तसेच इतर स्थानिक सोयी सुविधांसाठी मुख्य अभियंता स्तरावरून विशेष प्रयत्न करण्यात यावे असे मत श्री. पंकज सपाटे यांनी व्यक्त केले. कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४८ व्या वर्धापन दिनाच्या समारोपीय कार्यक्रमात ते रंगमंच कोराडी येथे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कोराडी वीज केंद्राचे मा. मुख्य अभियंता श्री. अभय हरणे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून महानिर्मितीचे कार्यकारी संचालक श्री. पंकज सपाटे होते. विशेष अतिथी म्हणून कार्यकारी संचालक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदूरकर, कार्यकारी संचालक-१ श्री. गिरीश कुमरवार, मुख्य अभियंते श्री. शरद भगत, माजी मुख्य अभियंते श्री. राजकुमार तासकर, अनिल आष्टीकर,वर्धापन दिन समिती सचिव श्री. शैलेंद्र अर्जितवार, सहसचिव श्री. निलेश चरखे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी श्री. शैलेंद्र अर्जितवार यांनी अहवाल वाचन व प्रास्ताविक केले. यानंतर मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन, मा. संचालक (संचलन-प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, तत्कालीन मा. संचालक (खनिकर्म) मा.श्री. दिवाकर गोखले यांच्या शुभेच्छा संदेशांचे वाचन करण्यात आले.

याप्रसंगी श्री. नितीन चांदूरकर म्हणाले की, डिजिटल क्रांतीमुळे काम अगदी सोपे झाले आहे हे खरे. प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन असल्याने ऑनलाईन व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे सायबर गुन्हे हा अतिशय चिंतेचा विषय झाला आहे. मोबाईलवरून एप डाऊनलोड करतांना सहज एक्सेस देण्यात येत असल्याने डाटा सुरक्षित राहत नाही. ऑनलाईन कामकाजावर अवलंबून राहणे, सायबरविषयक नागरिकांमध्ये जागरूकतेचा अभाव, पोलीस दलाची तोकडी तांत्रिक क्षमता, तपासातील अडचणी, मोजकी सायबर स्थानके, मोबाईल एपची छुपी ग्राहक नीती, सायबर कायद्यातील तरतुदी, प्रभावी रेग्युलेटर नसणे, संघटीत सायबर माफिया यामुळे दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारी वाढतच आहे. वीज उत्पादन क्षेत्र अतिशय संवेदनशील असल्याने डाटा सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर जागरूकता तितकीच महत्वाची असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

श्री. गिरीश कुमरवार म्हणाले की मुख्यालयाच्या दृष्टीने हे केंद्र महत्वाचे असल्याने अपेक्षा वाढणे स्वाभाविक आहे. याप्रसंगी श्री. राजकुमार तासकर, श्री. अनिल आष्टीकर, श्री. शरद भगत यांनी समयोचित भाषणे केली. अध्यक्षस्थानाहून श्री. अभय हरणे म्हणाले की, कोराडीची एकूणच कार्यक्षमता अधिक वाढवावी लागेल त्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन दीप्ती राम, श्री. आकाश थूटे यांनी तर प्रभारी कल्याण अधिकारी श्री. दिवाकर देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सकाळी पूजेला माजी मुख्य अभियंता श्री. शरदचंद्र देव हे आवर्जून उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांमध्ये बॅडमिंटन, टेबल टेनिस, ब्रिज, बुद्धिबळ, कॅरम, क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, रांगोळी, चित्रकला, हाऊस कीपिंग स्पर्धा, रक्तदान शिबिर घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते सांघिक खेळांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. शिवाय इव्हेंट प्रस्तुत हिंदी-मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम श्री. सारंग जोशी, श्री. सागर मधूमटके आणि चमूने सादर केला.

या प्रसंगी उप मुख्य अभियंते सर्वश्री. विराज चौधरी, प्रफुल्ल कुटेमाटे, डॉ.अनिल काठोये, श्याम राठोड, अरुण पेठकर, अधीक्षक अभियंते, अंकुर जोशी, अशोक भगत, सचिन देगवेकर, कमलेश मुनेश्वर, संतोष चंद्रमणी, राजेश अलोणे, नितीन रोकडे, मनोज देशमुख प्रभारी, डॉ.भूषण शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकेश गजभिये, उप महाव्यवस्थापक (मासं) दिवाकर देशमुख, वरिष्ठ व्यवस्थापक सुरक्षा विनायक वडोदेकर तसेच कोराडी वीज केंद्राचे विभाग प्रमुख अधिकारी-कर्मचारी-तंत्रज्ञ-कंत्राटी कामगार, कुटुंबीय, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते तर वर्धापन दिन आयोजन समितीचे सर्व पदाधिकारी-सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.





# कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या पुढाकारानेच पालावलकर ट्रस्ट (हॉस्पीटल) यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. ४) श्री. ओ.डी. शिंदे, कल्याण अधिकारी श्री. पी.एस. निकम तसेच वैद्यकीय अधिकारी सौ. मृदुला पवार यांची उपस्थिती होती.

शिबीर यशस्वी करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांनी रक्तदान करण्यात मोलाचा वाटा उचलला तसेच वैद्यकीय विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र. ४) श्री. ओ.डी. शिंदे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री एम.एन. फडतरे, कल्याण अधिकारी श्री. पी.एस. निकम, लेखाधिकारी श्री. कारडे तसेच कोयना संकुलातील सर्व अधिकारी, कर्मचारी कुटुंबिय, विविध संघटनाचे पदाधिकारी, अलोर शिरगांव पोलीस स्टेशन कर्मचारीवृंद तसेच ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

तद्‌नंतर कोयना संकुलातील विश्वकर्मा अवार्ड मिळालेल्या कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. तसेच स्पोर्टस ॲथॉरिटी ऑफ इंडिया अंतर्गत तिरंदाज कोचिंग कोर्समध्ये 'अ' मानांकन मिळालेल्या सुरक्षा अधिकारी याचा प्रशस्तीपत्र व भेटवस्तु प्रदान करून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. कि.एस कदम यानी केले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून कोयना संकुलातील अधिकारी, कर्मचारी यांचे कुटुंबिय यांच्यावतीने विविध प्रकारच्या आंतरगृह, बाह्यगृह, शालेय गटातील विद्यार्थ्यांकरिता चित्रकला व निबंध स्पर्धेचे रिक्रिएशन क्लबच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये विशेष आकर्षण ठरले में महिला वर्गातून आयोजित केलेल्या खो-खो व क्रिकेट. सदर सामने पोफळीमध्ये प्रथमच घेण्यात आल्याने महिलांमध्ये चैतन्याचे वातावरण होते. सौ. घाडगे यांनी अथक परिश्रम घेऊन यशस्वी केल्या.

या सर्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रिक्रिएशन क्लबचे पदाधिकारी व क्रीडा स्पर्धेचे सर्व संयोजक यांनी विशेष योगदान दिले. क्रीडा स्पर्धांचा बक्षिस समारंभ सांस्कृतिक भवन पोफळी येथे मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.








# नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न



**नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. नितीन पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली भारताचा ७४वा प्रजासत्ताक दिन संपन्न झाला. मुख्य अभियंता मा.श्री. पुणेकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सुरक्षा अधिकारी, मेस्को गार्ड, सुरक्षा रक्षक मंडळ, अग्निशमन विभाग याद्वारे मानवंदना देण्यात आली तसेच सामुहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. सदर प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यावेळी नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी आणि कंत्राटी कामगार उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.**



## भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

भारताच्या ७४व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शक्तीगड या प्रशासकीय कार्यालयाच्या प्रांगणात मा. मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर वसाहतीमध्ये असलेल्या नवीन क्रीडा भवन येथे ध्वजारोहण झाले.

उपस्थितांना मा. मुख्य अभियंता यांनी संविधान उद्देशिका वाचन – प्रतिज्ञा वाचन करून प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने उपस्थितांना शुभेच्छासह मार्गदर्शन केले. आपल्या संदेशपर भाषणात मा. मुख्य अभियंता श्री. आव्हाड म्हणाले की, भारतीय संविधान दि. २६ जानेवारी १९५० रोजी देशाला लागू केले. २१व्या शतकात भारताला महासत्ता बनविण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी विशेषत: तरुणांनी अथक प्रयत्न करण्याची आवश्यक असल्याचे सांगितले. वीज क्षेत्रातील नवीन आव्हाने सर्व अधिकारी, कर्मचारी, अभियंते यांच्या सहकार्याने अधिकाधिक प्रगतीचे ध्येय गाठण्याबाबतचा विश्वास व्यक्त केला. सुरक्षा विभाग, मेस्को गार्ड, अग्निशमन विभाग, एम.एस.एफ. सुरक्षारक्षक यांनी तालबाद संचलनासह (मार्च पास) मा. मुख्य अभियंता श्री. आव्हाड यांना मानवंदना दिली. यानंतर सुरक्षा विभाग, मेस्को गार्ड, अग्निशमन विभाग, एम.एस.एफ. सुरक्षारक्षक यांचे परेड निरीक्षण झाले.

सांघिक कार्यालय, मुंबईमार्फत भुसावळ औ.वि. केंद्रास उत्कृष्ट कामगिरीकरिता ब्लॅक डायमंड, यांत्रिकोत्तम, विश्वकर्मा पारितोषिक बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच आंतर विद्युत केंद्र आंतरगृह / बाहयगृह क्रीडा स्पर्धेत यश संपादन केलेल्या कर्मचारी खेळाडूंचा यावेळी सत्कार करण्यात आला. श्री शारदा प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व द लिटील एंजल स्कूलच्या विद्यालयांमार्फत समुह नृत्य सादर करून उपस्थितांची शाबासकी मिळवली. याप्रसंगी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सर्वांनी कौतुक केले व बक्षिसेही दिली. विद्यार्थ्यांना चॉकलेट / बिस्कीट वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी नवीन क्रीडा भवन येथे पुस्तक प्रदर्शन साने गुरुजी वाचनालय, दीपनगर यांच्यामार्फत भरविण्यात आले होते. तसेच दिपशक्ती क्रीडा संकुल येथील प्रांगणात अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.







सदर कार्यक्रमास मुख्य अभियंता (प्रकल्प ६६० मेगावॅट) मा.श्री. विवेक रोकडे, उपमुख्य अभियंता (प्रशासन) श्री. पी.एस. लोटके, उपमुख्य अभियंता (५०० मेगावॅट) श्री. आर.एम. दुबडे, उपमुख्य अभियंता (प्रकल्प स्थापत्य) श्री. मनोहरराव तायडे, उपमुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. संतोष वकारे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारीश्री. मुकेश मेश्राम व सर्व अधीक्षक अभियंते, विभाग प्रमुख अधिकारी / कर्मचारी संघटना प्रतिनिधी व वसाहतीतील रहिवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. पंकज सनेर यांनी मानले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न







**मा. मुख्य अभियंता श्री. सोनपेठकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तत्पूर्वी सामुहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. तसेच विद्युत नगर वसाहतीमधील कामगार कल्याण केंद्र व एकविरा स्कूल ऑफ ब्रिलियंस शाळेत सुध्दा मा. मुख्य अभियंता श्री सोनपेठकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्युत नगर क्रीडा मंडळ व वाचनालयाद्वारे पुस्तक प्रदर्शनी व वि.न. बालोद्यानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पारस औ.वि. केंद्रातील सर्व अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी आणि कंत्राटी कामगार उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.**







# परळी औष्णिक विद्युत केंद्रात आंतरविद्युत केंद्र बाह्यगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ उत्साहात संपन्न










परळी औष्णिक विद्युत केंद्रातील खुले रंगमंच, शक्तीकुंज वसाहत येथील मैदानात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली आंतरविद्युत केंद्र बाह्यगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ उत्साहात संपन्न झाल्या. उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अप्पर पोलिस अधीक्षक, अंबेजोगाई मा. कविता नेरकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजुरकर, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी-भुसावळ श्री. मुकेश मेश्राम, तसेच भुसावळ आणि सर्व विद्युत केंद्रांचे कल्याण अधिकारी/ सहाय्यक कल्याण अधिकारी व संघ व्यवस्थापक उपस्थित होते. सदर स्पर्धेत ॲथलेटिक्स, भालाफेक, गोळाफेक, लांब उडी, कबड्डी, व्हॉलीबॉल, व क्रिकेट या स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाच्या निरोप समारंभ व बक्षित वितरण समारंभप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कार्यकारी संचालक (कोल) मा.श्री. राजेश पाटील, भुसावळ औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड, नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजुरकर, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी-भुसावळ श्री. मुकेश मेश्राम आणि अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.











## भुसावळ ६६० मेगावॅट क्षमतेच्या वीज प्रकल्प संचाचे 'बाष्पक प्रदीपन' यशस्वीरित्या संपन्न

महानिर्मितीच्या भुसावळ वीज प्रकल्प १×६६० मेगावॅट स्थापित क्षमतेच्या सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित संच क्रमांक ६ चे 'बाष्पक प्रदीपन' दि. ३० मार्च २०२३ रोजी सकाळी ११ वाजता महानिर्मितीचे मा. संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे यांच्या हस्ते नियंत्रण कक्षातून कळ दाबून यशस्वीरित्या बाष्पक प्रदीपन पूर्ण करण्यात आले. यावेळी मेसर्स भेल कंपनीचे महाव्यवस्थापक दिनेश जवादे, भुसावळ प्रकल्प आणि वीज केंद्राचे मुख्य अभियंते अनुक्रमे विवेक रोकडे, मोहन आव्हाड प्रामुख्याने उपस्थित होते.

**महानिर्मितीचा ६६० मेगावॅट क्षमतेचा चौथा संच :–** भुसावळ येथे महानिर्मितीचे ५०० मेगावॅट क्षमतेचे दोन संच (संच क्रमांक ४ व ५) आणि २१० मेगावॅट क्षमतेचा एक संच यामधून नियमित वीज उत्पादन सुरू असून त्यामध्ये आगामी काही दिवसांत भर पडून भुसावळ वीज केंद्राची स्थापित क्षमता १,८७० मेगावॅट इतकी होणार आहे. संच क्रमांक ६ चे अभियांत्रिकी, खरेदी आणि उभारणीचे काम मेसर्स भेल कंपनी करीत आहे. महानिर्मितीचा ६६० मेगावॅट क्षमतेचा हा चवथा संच आहे. यापूर्वी कोराडी येथे प्रत्येकी ६६० मेगावॅटच्या तीन संचांतून वीज उत्पादन सुरू आहे. चंद्रपूर २,९२० मेगावॅट, कोराडी २,१९० मेगावॅट नंतर आता भुसावळ १,८७० मेगावॅट हे महानिर्मितीचे तिसरे मोठे वीज उत्पादन केंद्र म्हणून साकारणार आहे.



सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून नोव्हेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याचे मुख्य अभियंता श्री. विवेक रोकडे यांनी सांगितले.

दि. २० फेब्रुवारी २०२३ मध्ये महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन यांनी भुसावळ प्रकल्पस्थळी पाहणी करून प्रगतीपर कामांचा आढावा घेतला होता आणि बैठक घेऊन कामांना अधिक वेग देण्याचे निर्देश दिले होते. बाष्पक प्रदीपन यशस्वीरित्या संपन्न झाल्याने महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन यांनी भुसावळ वीज प्रकल्पाचे सर्व अधिकारी–कर्मचारी आणि मेसर्स भेल कंपनी व अंतर्गत सर्व अधिकारी–कामगारांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उप मुख्य अभियंते सर्वश्री आर.एम. दुथडे, संतोष वकरे, प्रशांत लोटके, मनोहर तायडे, अधीक्षक अभियंते सर्वश्री. महेश महाजन, किशोर शिरभैय्ये, मनिष बेडेकर, योगेश इंगळे, पराग आंधे, राजु अलोने, सुमेध मेश्राम, सुनील पांढरपट्टे, महेंद्र पचलोरे, अतुल पवार, एस.एस. देशपांडे, कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. राजेश चिव्हाणे, कल्याण अधिकारी सर्वश्री. पंकज सनेर, सुधाकर वासुदेव प्रामुख्याने उपस्थित होते.

**भुसावळ वीज प्रकल्प माहिती :–** भुसावळ वीज प्रकल्पाचा अंदाजित खर्च ४५५० कोटी इतका असून यासाठी २० टक्के भाग भांडवल राज्य शासनाने तर ८० टक्के ग्रामीण विद्युतीकरण कॉर्पोरेशनकडून कर्ज रुपात वित्तीय सहाय्य घेण्यात आले आहे. १२२.३६ हेक्टर जमिनीवर हा प्रकल्प उभारला आहे. चिमणीची उंची २७५ मीटर असून सुमारे ९७०० मेट्रिक टन इतका कोळसा दररोज लागणार आहे. प्रकल्प कालावधी ४२ महिन्यांचा आहे.

**महानिर्मितीची सांघिक सामाजिक बांधिलकी :–** प्रकल्प स्थळी २५०० मनुष्यबळ कार्यरत असून सुमारे ९०० स्थानिक कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. महा राष्ट्र शासनाच्या योजने अंतर्गत कामगारांना दोन वेळेचे मोफत भोजन प्रकल्प स्थळी उपलब्ध करून देण्यात येत असल्याने कामगारांचा वेळ आणि आर्थिक बचत होऊन त्यांच्यामध्ये आनंददायी वातावरण आहे. तसेच १०० कामगारांना प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेतून प्रशिक्षित करण्यात आले आहे. भुसावळ प्रकल्पा लगतच्या २१ गावांसाठी १८.६४ कोटींच्या विकास कामांची तरतूद करण्यात आली आहे. फुलगांव आणि पिंपरी सेकम गावांसाठी पाणी पुरवठा योजना प्रगतीपथावर आहे.

## भुसावळ वीज केंद्राच्या संच ३ मधून सलग १०० दिवसांपासून अखंडित वीज उत्पादन

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील २१० मेगावॅट स्थापित क्षमतेच्या संच क्रमांक ३ मधून मागील १०० दिवसांपासून अखंडित वीज उत्पादन सुरू आहे. हा संच दि. ११ जानेवारी २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात आला तेव्हापासून ह्या संचातून वीज उत्पादन सुरू आहे. विशेष म्हणजे या संचाचे वयोमान ४१ वर्षे आहे. मागील रेकॉर्ड बघता, २००९ मध्ये हा संच अखंडित १९९ दिवस १० तास आणि ३१ मिनिटे सुरु होता.

भुसावळ वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड, उप मुख्य अभियंता श्री. प्रशांत लोटके, अधीक्षक अभियंते श्री. सुनील पांढरपट्टे, श्री. अतुल पवार, श्री. संजय हिरवे, श्री. सी.पी. रीतापुरे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम तसेच सर्व विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनानुसार येथील अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ व कर्मचारी यांनी हे यश साध्य केले आहे.

महानिर्मिती व्यवस्थापनाचे वेळोवेळी सहकार्य आणि भुसावळ वीज केंद्रातील मनुष्यबळाच्या सांघिक प्रयत्नांतून हे यश साध्य झाले असल्याचे मुख्य अभियंता श्री. आव्हाड यांनी सांगितले.

## भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न





दि. ८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्य अभियंता (प्रशासन) श्री. पी.एस. लोटके, उप मुख्य अभियंता (५०० मेगावॅट) श्री. आर.एम. दुबडे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम व सर्व अधिकारी आणि विभागप्रमुख उपस्थित होते.

मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड ह्यांनी स्त्रियांनी स्वत:ला ताणतणावातून मुक्त ठेवून कशा पध्दतीने काम करावे त्यादृष्टीने तर महानिर्मितीच्या यशामधे महिला कर्मचाऱ्यांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. भुसावळ औ.वि. केंद्रातील महिला कर्मचारी यांच्यासह वसाहतीतील सर्व महिलांसाठी सुध्दा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन, विशेष कामगिरीबद्दल महिला कर्मचारी यांचे सत्कार करण्यात आले. तसेच मुख्य अतिथी प्राचार्या डॉ. मंगला जंगले, एस.एन.डी.टी. कॉलेज. जळगाव यांचे जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन व व्याख्यान समावेश होता.



**क्रिकेट सामना :-** जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी सायंकाळी दिपशक्ती किडा संकुल, दीपनगर येथे क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांनी क्रिकेट सामन्याचे उद्‌घाटन करून क्रिकेट सामन्याला मुख्यत: करण्यात आली. याप्रसंगी श्री. पी.एस. लोटके, उप मुख्य अभियंता (प्रशासन), श्री मुकेश मेश्राम, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर स्पर्धेत भुसावळ औ. वि. केंद्रातील महिला अधिकारी / कर्मचारी यांनी सहभाग घेवून सामना खेळण्यात आला. तद्नंतर बक्षिस वितरण समारंभ पार पडला.

**स्वच्छता जागृती सायकल रॅली :-** दि. ५ मार्च २०२३ रोजी 'स्वच्छता जागृती' सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हान यांनी झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. तसेच सदर रॅलीप्रसंगी श्री मुकेश मेश्राम, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, भुसावळ व श्री. अतुल पवार, कार्यकारी अभियंता उपस्थित होते. यामध्ये औ.वि. केंद्रातील सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या रॅलीची सुरुवात ५०० मीटर फॅक्टरी गेटपासून सुरु करण्यात आली. याप्रसंगी रॅलीची सुरुवात झाल्यावर महिलांनी चौकाचौकात 'महिला सशक्तिकरण' या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. तसेच खालीलप्रमाणे विविध घोषवाक्य म्हणून सायकल रॅलीत मोठया संख्येने सहभाग घेतला.

**"डोळ्यांत येवू देवू नको पाणी, तु आहेस लढणारी झाशीची राणी".**

**"नहीं सहना है अब किसी का अत्याचार, महिला सशक्तिकरण का यहा है मुख्य विचार".**

**"सोडून द्या वाईट चालीरीती, महिलांना द्या शिक्षणाची गती".**

**मार्गदर्शन व तपासणी शिबीर** :- दि. ९ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. सुवर्णा गाडेकर (स्त्री रोग विशेषज्ञ), अर्पण हॉस्पिटल, भुसावळ यांचे 'स्तनाचा कॅन्सर' (कर्करोग) या विषयावर महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत मार्गदर्शन व तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. दिपनगर दवाखान्यात संपन्न झालेल्या या शिबिराच्या वीराया महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून लाभ घेतला.

याप्रसंगी मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड, मुख्य अभियंता (प्रकल्प - ६६० मेगावॅट) मा.श्री. विवेक रोकडे, उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. पी.एस. लोटके, उप मुख्य अभियंता (प्रकल्प) मा.श्री. संतोष वकारे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मा.श्री. मुकेश मेश्राम, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत जाधव, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी गायकवाड, कल्याण अधिकारी श्री. पंकज सनेर तसेच अन्य अधिकारी / कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून कार्यक्रम यशस्वीरित्या खेळीमेळीने पार पाडला. जागतिक महिला दिनानिमित्त विभागप्रमुख व संघटना प्रमुख यांनी शुभेच्छा पाठविल्या.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न





पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे महिला कर्मचारी व वि.न. महिला यांची संयुक्त समिती गठीत करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या समितीमध्ये अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर होते तर सचिव पदी उपकार्यकारी अभियंता कु. रोमाली शिराढोणकर होते.

जागतिक महिला दिनानिमित्त गठीत समितीद्वारे दिनांक ८ मार्च २०२३ ते १० मार्च २०२३ या दरम्यान विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये महिलांचे फनी गेम, अंताक्षरी स्पर्धा, नृत्य स्पर्धा, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ व आनंद मेळावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी दिनांक ८ मार्च २०२३ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन करून विविध महिला कर्मच्रयांनी मनोगत व्यक्त केले. तसेच उपमुख्य अभियंता श्री. धनंजय पधाडे व अधीक्षक अभियंता मा.श्री. संजय कांबळे यांनी महिला दिनाच्या शुभेच्छापर मार्गदर्शन केले व तद्नंतर, डॉ. संपदा सपकाळ, स्त्रीरोग तज्ञ, अकोला यांचे स्त्रियांचे दैनंदिन आरोग्य व घ्यावयाची काळजी विषयी मार्गदर्शन महिलांकरिता आयोजित करण्यात आले.

महानिर्मिती कंपनीच्या परिपत्रकानुसार महिलांचा विशेष कार्याबद्दल गौरवान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने, सौ. इंदिरा गावंडे (नर्स) यांनी कोरोना कालावधीत दोन कर्मचाऱ्यांचे जीव वाचविण्यात मोलाचे योगदान दिले व कु. रेश्मा नदाफ यांच्या कर्तव्यदक्ष व उत्कृष्ट दैनंदिन कार्य पार पाडण्याबद्दल एक महिला इंजिनियर म्हणून या दोघांचा गौरव करण्यात आला.

दिनांक १० मार्च २०२३ रोजी सायंकाळी समारोप व बक्षीस वितरणाचा कार्यक्रमात मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील विजेते महिलांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उप मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. धनंजय पंधाडे, अधीक्षक अभियंता श्री. संजय कांबळे, तसेच वि.न. महिला मंडळ प्रतिनिधी सौ. प्रीती पंधाडे व सौ. संजना कांबळे उपस्थित होते. तसेच इतर महिला कर्मचारी व विद्युतनगर महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक १२ मार्च २०२३ रोजी महिला कर्मचाऱ्यांकरिता सहल आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेऊन जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात पार पाडला.

सदर कार्यक्रमाचे सूत्र संचलन कु. रेणुका यादव व आभार प्रदर्शन प्रीती मानकर, जयश्री कोहळे यांनी केले.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न





कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी येथे सेवा इमारत ६६० मेगावॅट सभागृहामध्ये जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी भुषविले.

जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. शितल चिद्दलवार Prof. Mechanical Department VNIT Nagpur प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यानिमित्त कोराडी आणि विद्युत केंद्रातील महिलांकरिता निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, काव्य स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्युत केंद्रातील संचलन विभागात पाळीमध्ये काम करणाऱ्या महिला नाट्य, कला, साहित्य, क्रीडा, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना विशेष सत्कार करण्यात आला. महिलांनी आपल्या सुप्तगुणांचा अविष्कार याप्रसंगी विविध प्रसंगात सादर केला.

याप्रसंगी डॉ. शितल चिद्दलवार यांनी महिलांचे विविध योगदान यावर प्रकाश टाकत दुसऱ्या महायुद्धापासून ते आजपर्यंत अभियांत्रिकी गणिती व तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या महिलांची अधिक स्वरुपात माहिती दिली. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात वापरले जाणारे Roborts & Robotics याबद्दल अधिक माहिती देत वर्तमानात वापरले जाणारे Humanoids, Entertainment Robots, Dog Robots, Mico Robots, Guard Robots याबद्दल अधिक माहिती दिली.

याप्रसंगी जागतिक महिला समितीच्या अध्यक्षा सौ. तृप्ती मुधोळकर महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) तसेच उप मुख्य अभियंते सर्वश्री. विलास मोटघरे, प्रफुल्ल कुटेमाटे, अधीक्षक अभियंता श्री. अशोक भगत यांची विशेष उपस्थिती होती.

जागतिक महिला दिनाच्या यशस्वीतेकरिता सौ. विद्या बोकडे (सोरते), अति कार्यकारी अभियंता सौ. तृप्ती बावनकर, व्यवस्थापक, सौ. रिमा गिरी वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ, सौ. अर्पिता बहाले, वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ, सौ. साक्षी सिंगणापुरे, अति कार्यकारी अभियंता, कु. शरीय रस्से, सहा अभियंता, सौ. प्रगती घोंगे, कनिष्ठ सुरक्षा अधिकारी श्रीमती शितल चिंचुरकर यांनी अथक परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास सुत्रसंचलन सौ. प्रियका टेभुर्णे, सौ. प्राची ताथुरकर यांनी केले आणि विविध स्पर्धांचे परीक्षण श्री. दिवाकर देशमुख, महाव्यवस्थापक (मासं) प्रभारी कल्याण अधिकारी श्री प्रविण बुटे उप कार्यकारी अभियंता यांनी केले.

## पारस औष्णिक वीज केंद्र येथे ५२वा औद्योगिक राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताह संपन्न







दि. ०४ मार्च २०२३ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे ५२वा औद्योगिक राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताह मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उपसंचालक (औद्योगिक, आरोग्य व सुरक्षा) अकोला परिमंडळ मा. श्री रत्नपारखी यांची प्रमुख उपस्थिती लाभली व सुरक्षिततेसंबंधित त्यांनी मार्गदर्शन केले, याप्रसंगी सुरक्षिततेचा संदेश देणारे पथनाट्य सादर करण्यात आले.

राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहादरम्यान कारखाना परिसरात विविध प्रकारचे सुरक्षितता जनजागृतीचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले जसे की, अग्निशामक प्रात्यक्षिके, सुरक्षिततेसंबंधित सेमिनार, निबंध, सेटी स्लोगन, सेफटी पोस्टर स्पर्धा, विभागवार स्वच्छता स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेत सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, शिकाऊ उमेदवार, प्रकल्पग्रस्थ तसेच कंत्राटदार व कंत्राटी कामगार यांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला.

दि. १० मार्च २०२३ रोजी सुरक्षितता सप्ताहाचा समारोप कार्यक्रम विविध स्पर्धेचे पारितोषिक देऊन पार पाडण्यात आला, या कार्यक्रमाला अध्यक्ष मुख्य अभियंता मा. श्री. सुनिल सोनपेठकर, प्रभारी उपमुख्य अभियंता श्री. धनंजय पंधाडे, अधीक्षक अभियंता श्री. संजय कांबळे, श्री. राजेश गहूवार तसेच सर्व विभाग प्रमुख, अभियंते, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षितता अधिकारी श्री. हरीभाऊ मैदाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक अभियंता श्री. पंकज खोड यांनी केले, संपूर्ण सुरक्षितता सप्ताह कार्यक्रमाकरिता सुरक्षितता विभागातील कर्मचारी श्री. अरखराव, गजभिये, सौ. अंभोरे व शेख रऊफ यानी अथक परिश्रम घेऊन सप्ताह यशस्वी केला.

## ऊर्जानगर येथे पर्यावरणपूरक सार्वजनिक होळी उत्साहात साजरी







मानवी जीवनाची नाळ ही पर्यावरणाशी जुळलेली असल्यामुळे पर्यावरण रक्षणातच मानवी जीवनाचे रक्षण आहे व पर्यावरणातील ज्या संसाधनांची कमतरता आहे त्याचा नाश न करता ज्या समाजविघातक कुप्रवृत्ती वाढलेल्या आहेत त्याचे प्रतिकात्मक दहन करून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती श्री गुरुदेव सेवा मंडळ आणि युवा सोशल फाउंडेशन सोशल युवा ग्रुप ऊर्जानगरच्या वतीने सार्वजनिक पर्यावरणपूरक होळीचे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ऊर्जानगर वसाहतीतील खुले रंगमंच मैदान येथे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता मा.श्री. श्याम राठोड तर प्रमुख अतिथी प्रभारी उपमुख्य अभियंता श्री. सुहास जाधव, श्री. अनिल पुनसे, अधीक्षक अभियंता श्री. दिनेश चौधरी, श्री. पी.एम. जाधव, चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष महाअंनिस, श्री. प्रशांत दुर्गे, अध्यक्ष श्रीगुरूदेव सेवा मंडळ, सौ. मंजुषा पशेषराव येरगुडे सरपंच ऊर्जानगर, सौ. राठोड, श्री. मुरलीधर राठोड, अध्यक्ष अनिस ऊर्जानगर शाखा यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

परिसरातील पाला–पाचोळा जमा करून तयार केलेली पर्यावरणपूरक होळी उपमुख्य अभियंता श्री. श्याम राठोड यांचे हस्ते पेटविण्यात आली. सोबतच प्रमुख अतिथींच्या हस्ते समाजातील हिंसाचार बलात्कार, अंधश्रद्धा भ्रष्टाचार, आतंकवाद स्त्री भ्रुणहत्या, व्यसनाधीनता, हुंडाबळी या कुप्रवृतीचे होळीत दहन करण्यात आले. कार्यक्रमात मान्यवरांचे शुभेच्छापर मार्गदर्शन घेण्यात आले.

याप्रसंगी वसाहतीतील कविवर्य सर्वश्री. किशोर मुगल, सुरेंद्र इंगळे, मधुकर दुफारे यांनी आपल्या कविता सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. यावेळी पर्यावरण पूरक होळीनिमित्त पर्यावरण या विषयावर घेण्यात आलेल्या घोषवाक्य स्पर्धा व काळानुरूप पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचे फायदे या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आल्या, त्याचे बक्षिस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच पर्यावरणपूरक जुन्या साडीपासून कापडी पिशवी तयार करून त्याचा वापर करावा व प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन श्री. दिनेश चौधरी यांनी केले. 'होळी करा लहान पोळी करा दाना' या संकल्पनेतून होळी दहणानंतर जमा झालेल्या पुरण पोळ्या व इतर साहित्य एकत्र करून त्या वांढरी येथील मुलाच्या अनाथालयात आणि डेबू सावली वृद्धाश्रमात पोहोचविण्यात आल्या. याकरिता युवा कार्यकर्ते किसन अरदडे, वंश निकोसे, हर्बल मेश्राम व चमूंचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनिसचे उपाध्यक्ष श्री. दुरेंद्र गेडाम यांनी केले तर आभार श्री. संजय जूनारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता अंनिसचे कार्यकर्ते व इतर महाराष्ट्र अंनिसचे पदाधिकारी, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी आणि युवा सोशल फाऊंडेशन, युवा सोशल ग्रुप यांचे उत्तम सहकार्य लाभले आणि ऊर्जानगर वासियांचा सुध्दा उत्तम प्रतिसाद लाभला.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रास महानिर्मितीचे मा. संचालक (संचलन) यांची सदिच्छा भेट





महानिर्मितीचे मा. संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर यांनी पारस औष्णिक विद्युत केंद्रास सदिच्छा भेट दिली आणि वीज केंद्रातील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करुन उपाययोजनेबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर वीज केंद्राच्या कामगिरीचा आढावा घेतला.

सदर आढावा बैठकीत मा. संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर ह्यांनी पारस औष्णिक विद्युत केंद्र हे भारतातील अग्रगण्य वीज केंद्र असून पुढील वर्षात प्रथम ५ वीजनिर्मितीच्या यादीत आणण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन केले.

पारस औ.वि. केंद्रातील अधिकारी/कर्मचारी संघटना कृती समिती यांच्या तक्रारी जाणून घेतल्या व त्यांचे निराकरण करण्याचे आश्वासित केले.

याप्रसंगी पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर, उप मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. धनंजय पंधाडे, अधीक्षक अभियंते सर्वश्री. संजय कांबळे, नितीन शेटे, अभय मोहोड, सचिन डाखोळे, व अन्य अभियंते, अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.




## कोराडी औ.वि. केंद्राच्या मानव संसाधन विभागातर्फे कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेसंबंधी विशेष शिबिराचे आयोजन





मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. ०४/११/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार तसेच मुख्य कार्यालय मुंबई यांनी दिलेल्या सुचनेनुसार मुख्य अभियंता कोराडी ओ.वि कें. याच्या मार्गदर्शनानुसार कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता कर्मचारी निवृत्ती वेतन योजना (EPS-95 Joint Option Form) भरण्याकरिता मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याच्या दृष्टीने विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याकरिता प्रशासकीय इमारतीसमोर कर्मचारी/ सेवानिवृत्त कर्मचारी यांच्याकरिता मंडप टाकुन सूचना फलक लावुन कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली व त्यांच्याकडुन (EPS-95 Joint Option Form) भरून घेण्यात आले.

तसेच दि. २१/०२/२०२३ रोजी (EPS-95 Joint Option Form) भरण्याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते व फार्म भरण्याबाबत सर्वाना विस्तृत माहिती शंका, अडचणी याचे निरसन करण्यात आले त्यामध्ये सर्व संघटना प्रतिनिधी, अधिकारी/कर्मचारी अभियंता यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. दि. १८/०२/२०२३ शनिवार व दि १९/०२/२०२३ रविवार सुट्टीच्या दिवसी सुध्दा मानव संसाधन विभागातील तसेच औद्योगिक संबंध विभागातील कर्मचारी अधिकारी उपस्थित होते शिबिरामध्ये सुमारे २५०० कर्मचारी अधिकारी, सेवानिवृत्त कर्मचारी यांनी (EPS-95 Joint Option Form) भरून घेण्याबाबत लाभ घेतला.

शिबिराचे आणि कार्यशाळेचे आयोजन केल्याबाबत मा. कार्यकारी संचालक (मासं), मा. मुख्य महाव्यवस्थापक (मासं), मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, श्री शरद भगत (मुख्य अभियंता), श्री. विलास मोटघरे उप मुख्य अभियंता (प्रशासन), श्री. अशोक भगत, अधीक्षक अभियंता (प्रशासन) यांनी कौतुक केले आहे.

या शिबिराचे आणि कार्यशाळेचे सुत्रसंचलन श्री. दिवाकर देशमुख, महाव्यवस्थापक (मासं) / प्रभारी कल्याण अधिकारी यांनी केले.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात साकारलं मामाचं गांव - 'हॅप्पी स्ट्रीट'








उन्हाळ्यात शाळेला सुट्ट्या लागल्या की, मामाच्या गावाला जाऊन धमाल मस्ती करायची. गावाकडील निसर्गरम्य मातीशी नातं जोडीत नात्याची वीण अधिक घट्ट करायची, अशी आपली मराठी संस्कृती. मात्र धकाधकीच्या जीवनात ही जागा टि.व्ही., मोबाईल, फेसबुक, व्हॉट्सअॅपसारख्या आभासी दुनियेने व्यापल्याने जीवनाचा खराखुरा आनंद दूर झाला. मानवी जीवन तांत्रिक झालं. यातून उदयास आलेली शहरी संकल्पना म्हणजे 'हॅप्पी स्ट्रीट' मामाच्या गावाला न जाता सुट्टीच्या दिवशी सकाळच्या प्रहरी मुख्य रस्त्यावरील रहदारी काही वेळापुरता बंद करून त्या ठिकाणी मनसोक्त खेळ, धमाल मस्ती करायची, हा यामागचा उद्देश.

महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४८व्या वर्धापन दिनानिमित्त कोराडी विद्युतविहार वसाहतीतील मुख्य रस्त्यावर हॅप्पी स्ट्रीट 'मामाचं गांव' साकारण्यात आले. महानिर्मितीचे राज्यभरातील अधिकारी-कर्मचारी व कुटुंबियांसह कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, पारस व मुंबई मुख्यालयातील अधिकारी व कोराडी वसाहतीतील कुटुंबीय अशा चार हजार व्यक्तींनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. हिरव्यागार वृक्षांच्या सावलीत, रंगीबेरंगी फुगे, झेंडे, तोरणे, टोप्या, कागदी फुलांनी रस्त्याला आकर्षक सजविण्यात आले. सोबतीला मिकी माऊस, चार्ली चॅप्लिन आणि मोटू-पतलू कार्टून्स उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. वयाचे भान, आपलं-परक विसरून प्रत्येकाने बालपणीच्या खेळाचा निखळ आनंद लुटला. नेहमी चारचाकी चालविणारा बैलबंडी चालवित होता. माता-भगिनी मुलांना विसरून टिक्कर, बिल्ला, लगोरी, दोरीवरच्या उड्या, पाळण्याचा आनंद घेत होत्या. साडेतीन तास कसे संपले कळलेच नाही. घराकडे परतीची पावले वळायला तयार नव्हती. एवढा जीव हॅप्पी स्ट्रीट मामाच्या गावाने लावला. एरवी घरात बोलायला वेळ नसणारी पालकमंडळी 'हॅप्पी स्ट्रीट' वर एकमेकांशी खुलून बोलताना दिसली. पाल्य आपले आई-वडील टायर, लोखंडी रिंग चालवित धावत असल्याचे पाहून आश्चर्यचकित झाले. अनेकांनी गाणे म्हणून गळे साफ केले. जातपात, धर्म, वय, पद, गर्व दूर सारून प्रत्येक व्यक्ती स्वत:ला व्यक्त करीत नि:स्वार्थपणे सहभागी झाल्याचे दिसून येत होता. हॅप्पी स्ट्रीटच्या माध्यमातून अख्खं मामाचं गावंच कोराडीत साकारण्यात आले होते.

अखंडित वीज उत्पादनाचे राष्ट्रीय कार्य करणाऱ्या महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुबियांसाठी 'हॅप्पी स्ट्रीट' हा उत्तम पर्याय असल्याचे मुख्य अभियंता श्री. अभय हरणे म्हणाले. कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला. लहान मुलामुलींसाठी चेहऱ्याचे मास्क, बक्षिसे, बुढ्ढी का बाल, कागदी फुले, प्रशिक्षण, जादुचे प्रयोग, रिंगटोन्स, बंदुकीच्या गोळीने फुगे फोडणे, दोरीचे झुले, बैलगाडी, गायवासरु, उंट, टांगा घोडा, बकरीचे पिल्लू, बॉल गेम्स, सापशिडी, दोरीवरच्या उड्या, लहान सायकल, स्केटिंग, रांगोळी, चित्रकला, तरुणी व महिलांसाठी मेंदी, टॅटू, नेल आर्ट, बॅडमिंटन, फुटबॉल, लगोरी, बास्केटबॉल, कंबर रिंग, प्लेट धो, रबर रिंग, रेखाचित्र, पुरूषांसाठी फुटबॉल, बास्केटबॉल, कार्टुन्स, कंचे, भवरे, उपलब्ध होते.

फूड झोनमध्ये इंडियन कॉफी हाऊसचे खाद्यपदार्थ, शबाना बेकरीचे प्रोडक्ट्स, आईस्क्रीम, समोसा, चहा ढोकळा, मोमो, मोड कडधान्ये, भेळ, चणा-मसाला, पाणीपुरी, नारळपाणी, उकडलेली बोरं, अशा खाद्यपदार्थांची रेलचेल होती. ज्येष्ठांसाठी योगासने, बुध्दीबळ, कॅरम, वृत्तपत्र, मासिके, वाचन व संगीत, तर मुख्य स्टेजवर डिजे संगीत, रेडीओ जॉकीची धमाल, कॉमेन्ट्री, झुम्बा डान्सचा थरार, तर दुसऱ्या मंचावर प्रत्येकाला व्यक्त होण्याची संधी ज्यामध्ये गाणे, नृत्य, मिमिक्री, कविता, वाद्य वाजविणे अशा नाना तऱ्हेच्या कला अनेकांनी सादर केल्या. कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. अभय हरणे यांच्या मार्गदर्शनात कोराडी चमूच्या सहकार्याने 'हॅप्पी स्ट्रीट' मामाचं गांव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला महानिर्मितीचे मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) श्री. पंकज सपाटे, मा. प्रभारी कार्यकारी संचालक (कोळसा) श्री. राजेश पाटील, मुख्य अभियंते सर्वश्री. राजू घुगे, सुनील सोनपेठकर, माजी मुख्य अभियंता अनिल आष्टीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरूषोत्तम वारजूरकर, वर्धापन दिन समितीचे सचिव शैलेंद्र अर्जितवार, सहसचिव निलेश चरखे, प्रभारी कल्याण अधिकारी दिवाकर देशमुख, कोराडी - खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, विभागप्रमुख, अधिकारी अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी व कुटुंबिय उपस्थित होते. 'हॅप्पी स्ट्रीट' साकारण्यासाठी आयोजन समितीचे पदाधिकारी, सदस्य, स्थापत्य, विद्युत, अग्निशमन, सुरक्षा, सर्व विभागांनी मोलाचे सहकार्य केले.

## कोयना धरण पायथा विद्युतगृह येथील संच क्र. १ चे कॅपिटल ओव्हरऑलचे काम यशस्वीरित्या पूर्ण

महानिर्मिती कोयना जल विद्युत केंद्र संकुल अंतर्गत येणाऱ्या कोयना धरण पायथा विद्युतगृह येथील संच क्र. १ (१८ मेगावॅट) चे कॅपिटल ओव्हरऑलचे काम दिनांक ०५ सप्टेंबर २०२२ रोजी सुरु करण्यात आले होते. या संचाचे संचलन १९८० साली सुरू झाल्यापासून तब्बल ४० वर्षांनतर अशा प्रकारचे काम करण्यात आले. यामध्ये टर्बाईन रनर ब्लेड रिपेरिंग, क्रॉस आर्म रिपेरिंग, स्टेटर व रोटर क्लीनिंग, सर्व प्रकारचे सील रिप्लेसमेंट इ. महत्वाची कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात आले. कॅपिटल ओव्हरऑलचे काम ९० दिवसांसाठी प्रास्ताविक होते. परंतु, सदर काम हे फक्त ४२ दिवसांमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. सदर कॅपिटल ओव्हरऑलच्या कामासाठी कोयना जलविद्युत केंद्र संकुलचे मा. मुख्य अभियंता श्री. एस.जी. चोपडे व अधीक्षक अभियंता श्री. बी.जी. कोष्टी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

याच दरम्यान दि. ०७ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्युतगृहाचा ४०वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास कोयना जलविद्युत केंद्राचे अधीक्षक अभियंते सर्वश्री. बी.जी. कोष्टी, आर.के. कुमार, ए.डी. शिंदे व रेड्डी, कार्यकारी अभियंते सर्वश्री. डी.व्ही. पाटील, पी.एन. काळे तसेच कोयना धरण पायथा विद्युतगृहाचे अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्रातील अलोरे - टप्पा क्र.३ चा ४५वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात संपन्न







महानिर्मिती कोयना जल विद्युत केंद्र पोफळी (अलोरे टप्पा क्र. ३) च्या वर्धापन दिनानिमित्त सलग २१ दिवस अथक मेहनत घेऊन श्री विशाल बळवंत जाधव, तंत्रज्ञ-३ यांनी छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची ७८२५ खिळे आणि १५० ग्रॅम धान्याच्या सहाय्याने तयार केलेली "थ्रेड स्ट्रींग आर्ट" ही कलाकृती प्रत्येकासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

ही कलाकृती साकारत असतानाच या विभागामार्फत युनिट नं ०९ च्या CHO कामही सुरू होते जे की, दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी पूर्ण होऊन युनिट यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आले. या दरम्यान टर्बाईन रनर ब्लेड रिपेरिंगचे काम, HS Lub Pump मॉडिफिकेशन यांसारखी कामेही पूर्ण केली गेली. इतक्या साऱ्या कामांमधूनही स्टोअर कीपरसारखी महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळून वेळ मिळेल तसा ही कलाकृती साकारण्याचे कार्य श्री. विशाल जाधव यांनी साध्य केले आणि अलोरे वीजगृहाच्या ४५व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून अवघ्या २१ दिवसांतच दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी ही कलाकृती पूर्ण करून सादर केली, जी या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. या कार्यक्रमास कोयना जल विद्युत केंद्राने मा. मुख्य अभियंता श्री. चोपडे, अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. कुंभार, अधीक्षक अभियंता श्री. कोष्टी आणि शिंदे आणि कार्यकारी अभियंता श्री. बर्वे तसेच अलोरे विद्युत गृहाने अभियंते, कर्मचारी उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे कोयना संकुलातील सर्व कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांसाठी कार्यशाळेचे आयोजन






कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे साहेब व अधीक्षक अभियंता श्री. राजेश कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण उप केंद्र पोफळी यांचेतर्फे कोयना संकुलातील सर्व कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांसाठी "स्वयंप्रेरणेच्या दिशेने आयुष्य घडवताना (चला उत्कृष्टता जोपासूया)" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरहू कार्यशाळेसाठी सुप्रसिद्ध कॉर्पोरेट ट्रेनर व लाइफ कोच प्रोफे. इ.व्ही. गिरीश यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अधिकारी-कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. महादेव कोळेकर (उप कार्यकारी अभियंता) व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधीक्षक अभियंता श्री. राजीव रेड्डी यांनी भूषविले. कार्यक्रमास अधीक्षक अभियंते सर्वश्री. ब्रह्मानंद कोष्टी व श्री. अजय शिंदे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. स्नेहन नकाते-कोरे यांनी तर आभार प्रदर्शन उच्चस्तर लिपिक (वि. व ले.) श्रीमती सुनिता परमाणे यांनी केले.

## ई.पी.एस. - ९५ नवीन वाढीव पेन्शन योजनेच्या जनजागृतीसाठी महानिर्मितीतर्फे विशेष शिबिराचे आयोजन

ई.पी.एस. - ९५ नवीन वाढीव पेन्शन योजनेची माहिती पात्र सेवानिवृत्त आणि विद्यमान जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना कमीतकमी कालावधीत माहिती देऊन विहित नमुन्यात पर्याय २० फेब्रुवारीपर्यंत संबंधित कार्यालयात जमा करण्यासाठी महानिर्मितीने जनजागृतीपर ठोस कृती कार्यक्रम आखला होता. यात दि. १५ फेब्रुवारी २०२३ रोजी परिपत्रक काढून ते कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले. सोबतच वृत्तपत्रातून प्रसिद्धी देण्यात आली होती.

सप्टेंबर २०१४ पासून जानेवारी २०२३ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या तसेच विद्यमान कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुमारे १३००० व्यक्तींना त्यांच्या मोबाईलवर ह्या संदर्भात एस.एम.एस. पाठविण्यात आला. महानिर्मितीच्या सेवानिवृत्त, विद्यमान कर्मचारी, संघटना प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांशी निगडित व्हॉट्सअप ग्रुप्स, फेसबुक पेज तसेच सोशल मीडियावर परिपत्रक, पोस्टर, टेक्स्टसारखी माहिती प्रसिद्ध करण्यात आली. वीज क्षेत्रातील संघटना पदाधिकारी यांच्या मदतीने सदस्यांना माहिती देण्यात आली. दि. १८ ते २० फेब्रुवारी असे एकूण ३ तीन दिवस विशेष शिबिर म्हणजे शनिवार-रविवारला सुट्टी असतांना देखील वीज केंद्र स्तरावर नमुना फॉर्म स्वीकारण्यात आला. वीज केंद्र, क्षेत्रीय कार्यालये आणि मुख्यालयाचा उत्तम समन्वय रहावा म्हणून कंट्रोल रूम स्थापित करण्यात आली. मानव संसाधन, औद्योगिक संबंध विभागाचे अधिकारी समन्वय राखून होते.

ज्या कार्यालयातून कर्मचारी सेवानिवृत्त झाला असेल त्या कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन अथवा स्पीड पोस्टने नमुना अर्ज पाठवता येईल. महानिर्मितीच्या सेवानिवृत्त आणि विद्यमान कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी ही युद्धस्तरीय मोहीम राबविण्यात येत असल्याचे तत्कालीन कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. भीमाशंकर मंता यांनी सांगितले.

# महानिर्मिती कंपनीच्या नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे आंतर विद्युत केंद्र, आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ उद्‌घाटन संपन्न





**'उद्‌घाटन सोहळा' :-**

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे महानिर्मितीच्या तीन दिवसीय आंतर विद्युत निर्मिती क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन सोहळा सोमवार, दि. २१ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी 'शक्तीमान क्रीडा संकुल' नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे प्रचंड उत्साहात अतिथी व क्रीडा खेळाडू व रसिकांच्या उपस्थितीत जल्लोषात संपन्न झाला.

आंतरगृह किडा महोत्सव-२०२२ करिता उपस्थित असलेले सर्व अतिथी यांचे सन्मानपूर्वक वाहनामधून शालेय विद्यार्थी यांचेद्वारे लेझिम पथक व ढोल पथक याद्वारे मान्यवरांचे मैदानावरील क्रीडा संकुलातील व्यासपीठाकडे आगमन झाले. विद्यार्थ्यांनी आकर्षक व तालबध्द कवायती सादर केल्या.

क्रीडा उद्‌घाटन कार्यक्रमास मुख्य अभियंता (भुसावळ प्रकल्प) श्री. विवेक रोकडे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले तसेच मंचावर मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजुरकर, मुख्य अभियंता (नाशिक औ.वि. केंद्र) श्री. प्रफुल्ल भदाणे, उप महाव्यवस्थापक (मासं) श्री. नंदकुमार पांडे, जनसंपर्क अधिकारी श्री. महेश आफळे, माजी उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय अस्वले, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राजू पाचोरकर, उप मुख्य अभियंता (संचलन व सुव्यवस्था) श्री. बाबासाहेब पाटील, उप मुख्य अभियंता (प्रशासन), भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र श्री. प्रशांत लोटके, अधीक्षक अभियंते सर्वश्री. शशांक व्हाण, प्रविण गोसावी, अभिजित आहेर, श्री. राजेंद्र कुमावत, सौ. स्वाती फोले, कल्याण अधिकारी सर्वश्री. विलास हिरे, प्रसाद निकम, पंकज सनेर, मयूर मेढेकर, सहाय्यक कल्याण अधिकारी राणू कोपते, अमरजीत गोडबोले उपस्थित होते.

याप्रसंगी 'ध्वजारोहण' मा. अध्यक्ष यांचे हस्ते करण्यात आले. तसेच महानिर्मिती कंपनीचे 'ध्येयगीत' वाजविण्यात आले. वीज केंद्र खापरखेडा, भुसावळ, चंद्रपूर, कोराडी, पारस परळी, पुणे/नाशिक, पोफळी, उरण, सांघिक कार्यालय व नाशिक या ठिकाणच्या वीज निर्मिती केंद्रातील सर्व सहभागी संघव्यवस्थापक व खेळाडू संघाद्वारे अत्यंत शिस्तबद्ध मार्चपास (संचलन) करून मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. मार्चपासच्या दरम्यान संबंधित वीज केंद्रातील खेळाडू, विविध सांस्कृतिक, प्रेक्षणीय, धार्मिक, कला व क्रीडा क्षेत्रातील माहिती उपस्थित प्रेक्षकांना सांगण्यात आली.

यानंतर क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन प्रसंगी नाशिक औ. वि. केंद्रातील खेळाडू आंतरगृह व बाह्यगृह क्रीडा प्रकारातील खेळाडू यांनी 'क्रीडाज्योत' मैदानावर आणून मा. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांना मुख्य 'क्रीडाज्योत प्रज्वलन' करण्यासाठी सुपूर्त केली. तसेच उपस्थित अतिथी यांच्यासह हवेत तिरंगी रंगाचे फुगे सोडण्यात आले व मा. अध्यक्ष यांनी आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ चे औपचारिक उद्‌घाटन झाल्याचे जाहीर केले. या प्रसंगी सर्व उपस्थित संघाचे खेळाडू यांना क्रीडा स्पर्धेत सहभाग व क्रीडा नियमांचे पालन करण्याच्या दृष्टीने सामूहिक 'क्रीडा शपथ' देण्यात आली.

मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच सर्व उपस्थित मान्यवर ह्यांचे 'स्मृतिचिन्ह' व 'पुष्पगुच्छ' देवून यथोचित सत्कार मा. मुख्य अभियंता श्री. प्रफुल्ल भदाणे, अध्यक्ष आयोजन समिती व सदस्य यांनी केले.

याप्रसंगी महानिर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आपणा सर्वांचे प्रेरणास्त्रोत मा.डॉ. पी. अन्बलगन (भा.प्र.से.) यांनी सर्व वीज निर्मिती केंद्रातील सहभागी खेळाडू कर्मचारी व आयोजन समिती नाशिक औ. वि. केंद्र, यांना स्पर्धेकरिता अभिनंदनासह शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. याशिवाय महाराष्ट्रातून अनेकविध शुभेच्छा संदेश क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने प्राप्त झाले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मुख्य अभियंता (भुसावळ प्रकल्प) श्री. विवके रोकडे यांनी सर्व उपस्थित खेळाडू यांना स्पर्धेकरिता 'तरुण' या स्वलिखित कवितेमधून त्यांनी उपस्थित सर्व खेळाडू यांना अत्यंत समर्पक शब्दात आपले मनोगत व्यक्त केले. तसेच सहभागी खेळाडू कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या. खेळाडू यांनी गतकाळातील व सद्य परिस्थितीकडे न पाहता पुढील मार्गक्रमण करण्यासाठी प्रेरित केले.









भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे तत्कालीन मा. मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन साजरा करण्यात आला, यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले, त्याप्रसंगीचे हे छायाचित्र.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (२१० मेगावॅट) श्री. अरुण पेटकर यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती संपन्न झाली, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. धनंजय पंधाडे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. पी.एन. भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. पी.एन. भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मा. मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली, याप्रसंगी उपस्थित अधिकारी-कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. नितीन पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. नितीन पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. पी.एन. भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली संत संताजी जगनाडे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद उपस्थित होते.



पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य अधिकारी, कर्मचारी वृंद.



परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे उप मुख्य अभियंता मा.श्री. एच.के. अवचार यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. नितीन पुणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे उप मुख्य अभियंता मा.श्री. बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. शरद भगत यांच्या अध्यक्षतेखाली माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी वृंद.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे अधीक्षक अभियंता (प्रशासन) मा.श्री. अशोक भगत यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. मुख्य अभियंता श्री. पी.एन. भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस आणि इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय संकल्प दिवस संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी वृंद.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे उप महाव्यवस्थापक (मासं)/प्रभारी कल्याण अधिकारी मा.श्री. दिवाकर देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता (५०० मेगावॅट) श्री. आर.एम. दुथडे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मा. उप मुख्य अभियंता श्री. बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे उप मुख्य अभियंता मा.श्री. विलास मोटघरे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.




पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारीवृंद उपस्थित होते.

# दिनविशेष



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. पी.एन. भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद उपस्थित होते.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. शरद भगत यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. शरद भगत यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.



पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.



पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. सुनील सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली शहीद दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारीवृंद उपस्थित होते.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. शरद भगत यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद उपस्थित होते.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी वृंद.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे उप मुख्य अभियंता (प्रशासन) मा.श्री. पी.एस. लोटके यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, पुरुष व महिला अधिकारी-कर्मचारी वृंद.

# महानिर्मिती कंपनीच्या नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे आंतर विद्युत केंद्र, आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ बक्षिस वितरण कार्यक्रम दिमाखात संपन्न





**'समारोप व बक्षिस वितरण सोहळा' :-**

आंतरगृह क्रीडा महोत्सव-२०२२ समारोप व बक्षिस वितरण सोहळा करिता उपस्थित असलेले सर्व अतिथी यांचे सन्मानपूर्वक वाहनातून शालेय विद्यार्थी यांचेद्वारे आकर्षक अशा कवायतीसह लेझिम पथकाने व सुरेल व तालबध्द ढोल पथक यांचेद्वारे मान्यवरांचे व्यासपिठाकडे मैदानावरील क्रीडा संकुलातील व्यासपीठाकडे आगमन झाले. याप्रसंगी कार्यकमांचे अध्यक्ष मा. संचालक (प्रकल्प / संचलन) श्री. संजय मारुडकर हे होते. तर व्यासपीठावर मुख्य अभियंता (परळी औ.वि. केंद्र) श्री. मोहन आव्हाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरूषोत्तम वारजुरकर, मुख्य अभियंता (नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे) श्री. प्रफुल्ल भदाणे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम, सर्व अधीक्षक अभियंते, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे मा. अध्यक्ष तसेच उपस्थित मान्यवर ह्यांचे स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता (नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे) श्री. भदाणे यांनी केले. याकरिता मुख्य कार्यालयाचे मा. अधिकारीगण व खेळाडू यांचे आभार व्यक्त केले. तसेच खेळाडूंनी योग्य समन्वय ठेवून खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन सादर केल्याचे नमूद केले.

क्रीडा स्पर्धेचा 'अहवाल वाचन' मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री पुरूषोत्तम वारजुरकर यांनी केले. कार्यक्रमादरम्यान आंतरगृह क्रीडा स्पर्धेतील सेवानिवृत्त झालेले व होणारे खेळाडू कर्मचारी सौ. निलिमा ठोबरे, श्री. मल्लनगौडा गुरूवडेयर, श्री. जगदीश भडंग, श्री. नहीम शेख यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.

सर्व खेळ प्रकारातील मा. पंच (रेफरी) यांचे उपस्थित अतिथींच्या हस्ते गुलाबपुष्प व मानधन देवून क्रीडा स्पर्धेतील सहकार्याकरिता यथोचित सन्मान करण्यात आला.

आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ आयोजन व नियोजनाच्या दृष्टीने खेळाडू यांचे प्रत्यक्ष प्रतिक्रिया व अनुभव व्यक्त करण्यासाठी सर्व खेळाडू यांचेवतीने प्रातिनिधीक स्वरूपात पुरूष गटातून पारसचे श्री. मयूर चौधरी व कोराडी येथील महिला गटातून सौ. दिप्ती लोंढे या खेळाडूंनी आपल्या सर्वसमावेश अशा समर्पक शब्दांत आपले मनोगत व्यक्त केले.

मुख्य अभियंता (परळी औ.वि. केंद्र) श्री. मोहन आवाड यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या खिलाडूवृत्तीने सर्व उपस्थित खेळाडूंसोबत जोशपूर्ण संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना मा. संचालक (प्रकल्प / संचलन) श्री. संजय मारूडकर यांनी निर्मितीचे सर्व सहभागी खेळाडूना स्पर्धेतील सहभागाकरिता व खेळाडूंना आपल्या कलाकौशल्यासह सांघिक भावना ठेवण्याचे आवाहन केले. कंपनीच्या वीज निर्मिती करण्यास सक्षम राहण्याचा संदेश दिला. सर्व खेळाडू यांनी क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवावा तसेच निरंतर सातत्य ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले. सर्व विजेता व सहभागी खेळाडू यांचे अभिनंदनासह कौतुक केले.

आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२२ करिता झालेल्या क्रीडा स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात मा. अध्यक्ष यांचे हस्ते 'ध्वजाअवरोहण" करून महानिर्मिती 'क्रीडाध्वज' पुढील स्पर्धेकरीता मुख्य कार्यालयाचे प्रतिनिधी यांचेकडे सुपूर्त केला व तद्नंतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत तीन दिवस सातत्याने प्रज्वलित असणारी क्रीडाज्योत स्पर्धा संपन्न झाल्यामुळे मालविण्यात आली. याकरिता कार्यक्रमाचे मा. अध्यक्ष यांचेद्वारे आंतरगृह क्रीडा स्पर्धा समारोप झाल्याचे जाहीर करण्यात आले. वर्ष २०२२चा यशस्वी - उत्कंठावर्धक असा 'बक्षिस वितरण सोहळा' कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजयी खेळाडू कर्मचारी यांना वैयक्तिक व सांघिक गटाकरिता बक्षिसे देवून यथोचित सन्मान करण्यात आला. सर्व खेळाडू यांनी खेळनिहाय आपल्या वीज केंद्राचा ठसा उमटविण्याचा सांघिकपणे सकारात्मक प्रयत्न करून खिलाडूवृत्तीने पूर्ण स्पर्धेच्या कालावधीत उत्साहाने सहभाग नोंदविला.













## महानिर्मिती कंपनीच्या नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे आंतर विद्युत केंद्र, आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ बक्षिस वितरण कार्यक्रम दिमाखात संपन्न





आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ चे समारोप प्रसंगी मैदानावर सामुहिक 'राष्ट्रगीत' घेण्यात आले. तसेच सर्व खेळाडू यांनी जंबल मार्चपासच्या माध्यमातून पुन्हा नव्या उमेदीने व उत्साहाने पुढील नियोजित क्रीडा स्पर्धेत सांघिक सहभाग ठेवून आपल्या वीज केंद्राचे प्रतिनिधित्व करण्याचा मानस मनात ठेवून आपआपले कर्तव्याच्या ठिकाणी समाधानपूर्वक प्रस्थान केले. तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेच्या दरम्यान सर्व खेळाडू यांचेसाठी सांस्कृतिक मनोरंजन म्हणून सुरेल गीतांचा संगीत 'रजनी' व 'स्नेह भोजन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दोन्ही कार्यक्रमादरम्यान सर्व विभाग प्रमुख, सर्व वीज केंद्रातील कल्याण अधिकारी, सहाय्यक कल्याण अधिकारी व संघ व्यवस्थापक वीज केंद्रातील अधिकारी, अभियंते व कर्मचारीवृंद, सर्व संघटना पदाधिकारी, व्ही.एन. नाईक शिक्षण संस्थेचे प्राचार्य व शिक्षकवृंद, शालेय विद्यार्थी, प्रशिक्षण केंद्र, पत्रकार बांधव, सर्व कंत्राटदार आणि कंत्राटी कामगार व वसाहतवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हया कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी आपला मोलाचे सहकार्य केले.

आंतरगृह क्रीडा स्पर्धा २०२१-२२ चे 'उद्घाटन', 'समारोप व बक्षिस वितरण' कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. रागिनी कुलकर्णी, सौ. रुपाली पवार आणि श्री. अनिल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले यांनी केले.

## खापरखेडा वीज केंद्राच्या ३३व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक बांधिलकी अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन





खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या ३३व्या वर्धापन दिनानिमीत्त ९ ते ११ जानेवारी एकूण तीन दिवस भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकुण ६२५ बॅग रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

एकजूट, कटीबद्धता, कर्तव्य भावना आणि सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून विक्रमी रक्तदान झाले आहे. मागील वर्षी ४०९ रक्तपिशव्या संकलन करण्यात आल्या होत्या. मात्र यावर्षी सर्वांच्या सहकार्यातून विक्रमी रक्तसंकलन करण्यात यश प्राप्त झाल्याचे मुख्य अभियंता श्री. सुनील रामटेके यांनी सांगितले.

रक्तदानात महिलांची संख्या ५६ होती हे विशेष. श्री. अरुण पेटकर, प्रभारी श्री. जितेंद्र टेंभरे, अधीक्षक अभियंता श्री. सोमकुवर आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमित ग्वालबंशी यांनी पुढाकाराने रक्तदान केले.

शासकीय रक्तपेढी, जीवनज्योती रक्तपेढी आणि जी एस खंडेलवाल रक्तपेढी यांनी रक्त संकलनाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केले.

शिबिरात वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता डॉ. अनिल काठोये, श्री. जितेंद्र टेंभरे, श्री. अरुण पेटकर, सर्व अधीक्षक अभियंते, विभाग प्रमुख, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी, कुटुंबीय, कामगार, परिसरातील नागरिक, कंत्राटदार, पत्रकार, प्रकल्पग्रस्त, शिकाऊ उमेदवार तसेच संघटना प्रतिनिधींनीसह विविध जागरूक नागरिकांनी रक्तदान करुन मोलाचे सहकार्य केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्वश्री. डॉ. अमित ग्वालबंशी, डॉ. प्रियंका सरोदे, डॉ. अतुल दंडाळे, डॉ. बावणे, भूषण दाणी, पुरुषोत्तम मानकर, विजय शास्त्रकार, वैजनाथ गर्जे, मेघराज निळे, मयूर झाडे, विवेक गुंडरुकवार, उमेश ढेपे, प्रमोद खनके, चंदू बोरकर, जयसिंग रछोरे, तेजस सोनवणे, कैलास जांभुळकर, देवा रामटेके तसेच कंत्राटी कामगार भूपेन्द्र चतुर्वेदी, दिलीप येवले, रोषण गोस्वामी, विनोद बनसोड, उमेश पारधी, प्रवीण हाते, कमलाकर खोडे, योगेश खडतकर, प्रकाश गेडाम, विलास गुजरमाळे, मुकेश ढोले यांचे मोलाचे सहकार्य लाभले. रक्तदान शिबीर आयोजन समिती आणि खापरखेडा व्यवस्थापनाकडुन सर्व रक्तदात्यांचे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा ३३ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न







स्पर्धेच्या युगात अधिक कार्यक्षम होण्यासाठी कुटुंबाचा हातभार महत्वाचा असतो. वीज उत्पादनासाठी कोळसा महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे कोळसा पुरवठ्याची किंमत कमी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. महानिर्मिती इंदर, कामठी, भानेगाव, सिंगोरी, गोंडेगाव ह्या नजीकच्या पाच कोळसा खाणीतून थेट वीज केंद्रात पाईप कन्व्हेयर प्रणालीद्वारे कोळसा पुरवठा करण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि लवकरच पहिल्या टप्प्याची यशस्वी चांचणी घेण्यात येणार असल्याचे महानिर्मितीचे तत्कालीन मा. संचालक (खनिकर्म) श्री. दिवाकर गोखले यांनी दि. ८ जानेवारी २०२३ रोजी खापरखेडा येथील मनोरंजन केंद्र क्रमांक १ सभागृहात ३३ व्या वर्धापन दिन समारोपीय समारंभात प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील रामटेके तर प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (खनिकर्म) श्री. दिवाकर गोखले होते तर मंचावर विशेष अतिथी म्हणून प्रभारी कार्यकारी संचालक श्री. राजेश पाटील, मुख्य अभियंते श्री. राजू घुगे, श्री. शरद भगत, श्री. नारायण राठोड, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, वर्धापन सचिव श्री. विजय अढाऊ प्रामुख्याने उपस्थित होते.

राजेश पाटील म्हणाले की, खापरखेडा टीम उत्तम आहे, स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी आणि मुख्यालयाच्या अपेक्षेनुसार अधिक जोर लावणे गरजेचे आहे. एप्रिल २०२२ मध्ये कोळशाचा साठा ४.५ लक्ष मेट्रिक टन होता आता जवळपास १९ लक्ष मेट्रिक टन इतका आहे. वीज उत्पादनासाठी आवश्यक कोळसा पुरवठा करण्यात येईल मात्र आवश्यक त्या सुधारणा करून हे वीज केंद्र अधिक कार्यक्षम करण्याचे आव्हान आहे त्यादृष्टीने प्रयत्न करायला हवा. याप्रसंगी मुख्य अभियंते श्री. राजू घुगे, श्री. शरद श्री. भगत, श्री. नारायण राठोड, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते यांची समयोचित भाषणे झाली. अध्यक्षस्थानाहून बोलतांना मुख्य अभियंता श्री. सुनील रामटेके म्हणाले की, खापरखेडा ५०० मेगावॅट संच क्रमांक ५ ने मागील वर्षभरात वीज उत्पादनाचे विक्रम केले आहे. मुख्यालयाच्या अपेक्षेनुसार २१० मेगावाटचे जुने संच आणि विविध आव्हाने असली तरी यावर यशस्वी मात करण्यासाठी खापरखेडा टीम निश्चित प्रयत्न करेल अशी त्यांनी ग्वाही दिली.

प्रारंभी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन तसेच संचालक व इतर मान्यवरांच्या शुभेच्छा संदेशांचे वाचन करण्यात आले. आकर्षक अश्या कराटे प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची वाहवा मिळवली. वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट, बॅडमिंटन,टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, कॅरम, गंमतीशीर खेळ, रस्सा खेच, मॅरेथॉन, बुद्धिबळ, रांगोळी, चित्रकला, परिसर स्वच्छता, आनंद मेळावा, तांत्रिक प्रदर्शनी, महिला मंडळ कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

या प्रसंगी उप मुख्य अभियंते सर्वश्री. डॉ. अनिल काठोये, जितेंद्र टेंभरे, अरुण पेठकर, अधीक्षक अभियंते संजय तायडे, संजीवकुमार पखान, विश्वास सोमकुंवर, प्रवीण रोकडे, उमेद श्यामकुंवर, डॉ. अमित ग्वालबंशी, विभाग प्रमुख, पुरुष-महिला मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन प्रसाद चौधरी, पल्लवी शिरसाठ यांनी तर उपस्थितांचे आभार विजय अढाऊ यांनी मानले. ३३ वा वर्धापन दिन यशस्वी करण्यासाठी आयोजन समिती,अधिकारी, विभाग प्रमुख, अभियंते,तंत्रज्ञ,कर्मचारी, कंत्राटी कामगार, संघटना प्रतिनिधी, कुटुंबीय, कंत्राटदार, पुरवठादार इत्यादींचे सहकार्य लाभले.

## ४५ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळ आयोजित व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा कोलकता येथे संपन्न

४५ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळद्वारा दि. १४ मार्च २०२३ ते दि. १५ मार्च २०२३ रोजी दरम्यान कोलकाता येथे व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा सराव शिबीर दि. ८ मार्च २०२३ ते दि. १२ मार्च २०२३ रोजी पर्यंत कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदर सराव शिबीराकरिता दि. ८ मार्च २०२३ रोजी विविध विद्युत केंद्रातून नियुक्त झालेले विशाल मुंडे, सोहेल शेख, सचिन शेळके, महेश कुसरामे, विष्णु पुले, इम्तियाज मोमीन, शिवदास घुले, शंकर नागरगोजे, आकाश अरखेल, अक्रम शेख, नितीन स्वामी, सचिन डांगोरे असे एकूण १२ व्हॉलीबॉल खेळाडू आणि संघ प्रशिक्षक श्री वसंत मुरकुटे आणि प्रसाद एस. निकम, कल्याण अधिकारी तथा संघ व्यवस्थापक उपस्थित झाले होते.



व्हॉलीबॉल संघ खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथील वसाहतीमधील व्हॉलीबॉल मैदानावर दि. ८ मार्च २०२३ रोजी पासून ते दि. १२ मार्च २०२३ रोजी संघाचे प्रशिक्षक श्री वसंत मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व खेळाडूंकडून कसून सराव करून घेण्यात आला.

महानिर्मिती कंपनीचा व्हॉलिबॉल संघ दि. १३ मार्च २०२३ रोजी सॉल्ट लेक येथे अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळाची व्हॉलिबॉल खेळासंदर्भात लॉट्सबाबत बैठक घेण्यात आली. दि. १४ मार्च २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता कोलकाता येथील न्यू मार्केट परिसरातील व्हॉलीबॉल असोशिएशनच्या मैदानावर व्हॉलीबॉल स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला व स्पर्धेला सुरुवात झाली.

या स्पर्धेमध्ये पंजाब, दिल्ली, केरळ, महाराष्ट्र, कोलकाता, छत्तीसगढ, हरियाणा, बिहार, उत्तर प्रदेश, तमिलनाडू, तेलंगना, गुजरात, कर्नाटक अशा विविध राज्यातील विद्युत कंपनीचे असे १४ व्हॉलीबॉल संघ सहभागी झाले होते. अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळाच्या यापुर्वीच्या म्हणजेच कोरोना (कोवीड) च्या आधी नाशिक येथे पार पडलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये महानिर्मितीच्या व्हॉलीबॉल संघाला चौथे स्थान प्राप्त झाले होते. त्यामुळे सर्वप्रथम गट अ मधून महानिर्मिती व्हॉलीबॉल संघाला प्रथम बाय देण्यात आला होता. त्यामुळे अ गटामधून उपांत्यपूर्व सामन्यामध्ये प्रवेश मिळाला होता. त्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी महावितरण विरूध्द महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी महानिर्मिती प्रथम सामना खेळण्यात आला यामध्ये महानिर्मितीच्या संघाने सामना जिंकला व पुढील उपांत्य फेरीसाठी आगेकुच केली. 'अ' गटामधून उपांत्य फेरीमध्ये गतविजेता केरळ या संघासोबत सामना खेळण्यात आला. परंतु केरळ विद्युत मंडळाचा व्हॉलीबॉल संघ हा सर्वोत्तम संघ असल्यामुळे केरळ संघाने हा सामना सहजपणे जिंकला आणि महानिर्मिती संघाला हार मानावी लागली. तद्नंतर चौथ्या आणि तिसऱ्या स्थानाकरिता महानिर्मिती कंपनी विरूध्द कोलकाता विद्युत मंडळ यांच्यामध्ये सामना खेळण्यात आला. यामध्ये प्रथम सेटमध्ये महानिर्मितीचा संघ आघाडीवर होता. परंतु काही वेळानंतर कोलकाता संघाने आघाडी घेतली व पुढील सर्व सेट कोलकाता संघाने घेतले, त्यामुळे महानिर्मिती संघाला चौथ्या स्थानी समाधान मानावे लागले. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान सर्व खेळाडूमध्ये खिलाडू वृत्तीचे वातावरण दिसून येत होते.

# महानिर्मितीचे माननीय अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन यांची कोराडी-खापरखेडा वीज केंद्रास भेट





स्पर्धेत टिकण्यासाठी स्वस्त दरात वीज उत्पादन आणि कार्यक्षमता वाढवावी लागेल. वीज उत्पादनाच्या प्रत्येक घटकावर लक्ष केंद्रित करून अतिशय नियोजनबद्ध व्यावसायिक पद्धतीने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन यांनी केले. ३×६६० मेगावॅट क्षमतेच्या कोराडी वीज केंद्र सभागृहात आयोजित अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.

महानिर्मितीच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डॉ.पी. अन्बलगन यांनी नागपूर दौऱ्यात कोराडी-खापरखेडा वीज केंद्राचा दौरा करून वीज उत्पादनाशी निगडित सर्व घटकांवर जसे कोळसा, एफ.जी.डी. राख, पाणी, वीज उत्पादन कार्यक्षमता वाढविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली व प्रत्येकाने गंभीरतेने योगदान वाढवणे गरजेचे असल्याचे स्पष्ट निर्देश दिले.

प्रारंभी त्यांनी कोराडी ३×६६० मेगावॅट मॉडेलचे निरीक्षण केले, त्यानंतर संच क्रमांक ८ व ९ तसेच खापरखेडा संच ५ नियंत्रण कक्ष व वॅगन टिपलरला भेट दिली. कोराडी प्रशिक्षण केंद्र, अत्याधुनिक पूर्णत: एकत्रित सुरक्षा प्रणालीची त्यांनी पाहणी केली तसेच कोळसा पाईप कन्व्हेयर प्रकल्पाला भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

सदर दौऱ्यात मा. संचालक (संचलन व प्रकल्प) श्री. संजय मारुडकर, मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था) श्री. पंकज सपाटे, मा. कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) डॉ. नितीन वाघ, राजेश पाटील, मा. मुख्य अभियंते सर्वश्री. राजू घुगे, राजेश कराडे, नारायण राठोड, शरद भगत व तत्कालीन मा. मुख्य अभियंता मा.श्री. अभय हरणे, उप मुख्य अभियंते सर्वश्री. विराज चौधरी, प्रफुल्ल कुटेमाटे, अरुण पेटकर, डॉ. अनिल काठोये, जितेंद्र टेम्भरे, विजय बारंगे, शिरीष वाठ, विलास मोटघरे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) तृप्ती मुधोळकर, अधीक्षक अभियंते, विभाग प्रमुख तसेच संबंधित एजन्सीजचे प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते.









# परळी औष्णिक विद्युत केंद्राचा ५१वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न












परळी औष्णिक विद्युत केंद्राचा ५१वा वर्धापन दिन मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यानिमित्त अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. तसेच आनंद मेळा व बक्षिस वितरण समारंभ संपन्न झाला. सदर कार्यक्रमास सर्व अधिकारी-कर्मचारी, संघटना पदाधिकारी, कंत्राटदार व कंत्राटी कामगार तसेच वसाहतीतील रहिवाश्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.












# चंद्रपूर व कोराडी औष्णिक विद्युत केंद्रे पॅट सायकल - २ करिता राष्ट्रीय स्तरावर सन्मानित



२९२० मेगावॅट स्थापित क्षमता असलेले चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचा वीज निर्मिती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीचा नावलौकिक आहे. महाराष्ट्राला नियमित आणि स्वस्त दरात वीज पुरवठा करण्यात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मोठे योगदान आहे.

कामगिरी व कार्यक्षमता सातत्याने उत्कृष्ट ठेवण्यासाठी चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्राने पॅट सायकल-२ मध्ये वाढीव यश मिळविले आहे. पॅट (PAT) ही नॅशनल मिशन फॉर इनहान्स्ड एनर्जी National Mission for Enhanced Energy Efficiency (NMEEE) अंतर्गत बाजारपेठेवर आधारित यंत्रणा आहे, ज्यात व्यापार करता येणाऱ्या ऊर्जा बचतीच्या प्रमाणाद्वारे ऊर्जेची बचत अधिक खर्च प्रभावी बनवते. पर्यावरणपूरक जीवन ही या आयोजनामागची संकल्पना आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राने विविध ऊर्जा संवर्धनाच्या प्रयोगानंतर नेट युनिट उष्णता दर २५९८.१ किलोकॅलरी/के.डब्ल्यू.एच. साध्य केले व लक्षित नेट युनिट उष्णता दरात १३९.४९ किलोकॅलरी/के.डब्ल्यू.एच. ने कमी करण्यात यश संपादन केले. सदर यशामुळे पर्यावरणाचा ऱ्हास/हानी कमी होण्यास हातभार लागला आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राकडे सकारात्मक ESCerts ची संख्या १८८८९५ आहे, अंदाजे त्याची किंमत ३४.७६ कोटी रुपये आहे. देशात एकूण सर्व नियुक्त ग्राहकांना (designated consumers) मिळालेल्या ESCerts पैकी १० टक्के वाटा हा निव्वळ चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्राचा आहे.

Bureau of Energy Efficiency च्या स्थापना दिनी म्हणजेच १ मार्च रोजी ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. PAT-2 अंतर्गत १५४ राष्ट्रीय औष्णिक विद्युत केंद्रामध्ये देशातील सर्वाधिक ESCerts मिळवत चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्र प्रथम असल्यामुळे सदर कार्यक्रमात चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्राचा यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी आर.के. सिंग, मंत्री (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) भारत सरकार यांचे हस्ते चंद्रपूर वीज केंद्राला सन्मानित करण्यात आले. महानिर्मितीचे मा. कार्यकारी संचालक मा.श्री. पंकज सपाटे यांनी हा सन्मान नवी दिल्ली येथे स्वीकारला. याप्रसंगी भारत सरकारचे श्री. आलोक कुमार, सचिव, ऊर्जा मंत्रालय, श्री. आशिष उपाध्याय, अतिरिक्त सचिव ऊर्जा मंत्रालय, श्री. अजय तिवारी, BEE चे महासंचालक श्री. अभय भाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.

महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन, मा. संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश संपादन करणे शक्य झाले. तसेच चंद्रपूर वीज केंद्रात कार्यरत अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी यांचे कामाप्रती असलेले समर्पण आणि उत्स्फूर्त सहभागाचा हा परिपाक असल्याचे मा. कार्यकारी संचालक मा.श्री. पंकज सपाटे यांनी सांगितले. त्यांनी



२१९० मेगावॅट स्थापित क्षमता असलेले कोराडी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचा वीज उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीचा नावलौकिक आहे. महाराष्ट्राला नियमित आणि स्वस्त दरात वीज पुरवठा करण्यात कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मोठे योगदान आहे.

कोराडी औष्णिक वीज केंद्राने विविध ऊर्जा संवर्धनाच्या प्रयोगानंतर नेट युनिट उष्णता दर २६६३.७० किलोकॅलरी/के.डब्ल्यू.एच. साध्य केले व लक्षित नेट युनिट उष्णता दरात ६५५.९० किलोकॅलरी/के.डब्ल्यू.एच. ने कमी करण्यात यश संपादन केले. सदर यशामुळे पर्यावरणाचा ऱ्हास/हानी कमी होण्यास हातभार लागला आहे.

कोराडी औष्णिक वीज केंद्राकडे सकारात्मक ESCerts ची संख्या १३२९९६ आहे, अंदाजे त्याची किंमत २४.४७ कोटी रुपये आहे. देशात एकूण सर्व नियुक्त ग्राहकांना (designated consumers) मिळालेल्या ESCerts पैकी ७ टक्के वाटा हा निव्वळ कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचा आहे.

Bureau of Energy Efficiency च्या स्थापना दिनी म्हणजेच १ मार्च रोजी ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. PAT-2 अंतर्गत १५४ राष्ट्रीय औष्णिक विद्युत केंद्रामध्ये देशातील सर्वाधिक ESCerts मिळवत कोराडी औष्णिक विद्युत केंद्र द्वितीय असल्यामुळे सदर कार्यक्रमात कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचा यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी आर.के. सिंग, मंत्री (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) भारत सरकार यांचे हस्ते कोराडी वीज केंद्राला सन्मानित करण्यात आले. कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मा. मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी हा सन्मान नवी दिल्ली येथे स्वीकारला. याप्रसंगी श्री. आलोक कुमार, सचिव, ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, श्री. अजय तिवारी, अतिरिक्त सचिव, ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, ऊर्जा दक्षता ब्यूरोचे महासंचालक श्री. अभय भाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.

महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन, मा. संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, तत्कालीन प्रभारी संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, मा. कार्यकारी संचालक श्री. पंकज सपाटे यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश संपादन करणे शक्य झाले तसेच कोराडी वीज केंद्रात कार्यरत अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी यांचे कामाप्रती असलेले समर्पण आणि उत्स्फूर्त सहभागाचा हा परिपाक असल्याचे मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी सांगितले. त्यांनी कोराडी वीज केंद्राच्या संबंधित सर्वाचे विशेष अभिनंदन केले आहे.

# वीरगती प्राप्त झालेल्या कोविड वीज योध्यांच्या स्मरणार्थ चंद्रपूर वीज केंद्रात ‘निर्भय शिल्प’

निर्भय शिल्प हे वीज क्षेत्रातील मनुष्यबळामध्ये निरंतर राष्ट्रभावना जागृत ठेवण्याचे, सर्मपित कार्य संस्कृतीचे आणि निर्भयतेचे प्रतिक ....श्री.संजय मारुडकर

कोरोना जागतिक महामारीच्या काळात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील कार्यरत महानिर्मितीच्या अधिकारी, कर्मचारी, प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी तसेच कंत्राटी कामगारांनी अविरतपणे काम करुन वीजेचे अखंडीत उत्पादन ठेऊन राष्ट्राची सेवा केलेली आहे.







कोविड काळात जीविताची पर्वा न करता वीज उत्पादनाच्या राष्ट्रीय कार्यात योगदान देत असताना सन २०१९ ते २०२१ या कालावधीत कोविड संसर्गामुळे मृत्युमुखी पडलेल्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील ३२ कोविड वीज योध्दांच्या स्मरणार्थ विद्युत केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ ‘निर्भय शिल्प’ साकारण्यात आले आहे. हे शिल्प वीज क्षेत्रातील मनुष्यबळामध्ये निरंतर राष्ट्र भावना जागृत ठेवण्याचे, समर्पित कार्य संस्कृतीचे आणि निर्भयतेचे प्रतिक असल्याचे महानिर्मितीचे मा. संचालक (संचलन–प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर यांनी प्रतिपादन केले. निर्भय शिल्पाला पुष्पचक्र अर्पण करून वीरगती प्राप्त झालेल्या ३२ वीज योध्दांना याप्रसंगी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.



दिवंगत व्यक्तीच्या परिवाराला म्हणजेच एकूण ३२ कुटुंबांना प्रत्येकी रुपये ३० लाख (कोविडमुळे मृत्यूपोटी) आणि २३ कुटुंबाला प्रत्येकी रुपये २० लाख (गट विमा मुदत योजनेपोटी) असे एकूण १४.२ कोटी अदा करण्यात आले आहे.

श्री.पंकज सपाटे यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे अभिनव असे निर्भय शिल्प महानिर्मितीमध्ये बहुदा पहिले असे शिल्प असून वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत विपरीत परिस्थितीत अहोरात्र मेहनत घेणाऱ्या मनुष्यबळाचे वैयक्तिक महत्व पटवून देणारे आहे हे विशेष.

याप्रसंगी प्रभारी कार्यकारी संचालक (कोळसा) मा.श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (सं व सु–२) मा.श्री.पंकज सपाटे, मा. मुख्य अभियंता मा.श्री. विवेक रोकडे, वीज केंद्राचे उप मुख्य अभियंते, अधिकारी, विभाग प्रमुख तसेच दिवंगत कोविड वीज योध्दांच्या परिवारातील सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

**वीरगती प्राप्त झालेले कोविड वीज योध्दे :** अमलेश देशमुख – उपअग्निशमन अधिकारी, नरेश खिमजी भट्टी – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अविनाश नारायण मेश्राम – उपकार्यकारी अभियंता, श्रीकृष्ण नामदेव सोनुले – कनिष्ठ अभियंता, दादाराव बापुराव शहाने – कनिष्ठ अभियंता, सुभाष किसन येरमे – तंत्रज्ञ –१, प्रकाश वनोसा शेंडे – तंत्रज्ञ–१, संतोष दयालराव रणदिवे – तंत्रज्ञ–१, अशोक चंपतराव जाधव – तंत्रज्ञ–१, राजेश्वर सुरेश ढोले – तंत्रज्ञ–१ ,पद्माकर रामचंद्र महल्ले – तंत्रज्ञ –१, कामेश्वर वसंतराव नन्नावरे – तंत्रज्ञ–१ , प्रकाश दादाजी मडावी – तंत्रज्ञ–१ , संजय दिगंबर लेकुरवाळे – तंत्रज्ञ–२ ,गुणवंत सुर्यभान मेश्राम – तंत्रज्ञ–२ , विजय भागवत मुंडे – तंत्रज्ञ –२, श्री. भाष्कर गणपत चौखे – तंत्रज्ञ –३, गिरीधर मुकुंदराव आरके – तंत्रज्ञ–३ ,गजानन बापुराव गायकवाड – तंत्रज्ञ–३, वसंत राजाराम नन्नावरे – तंत्रज्ञ–३, सुरेश मारोती तलांडे – तंत्रज्ञ–३, कृष्णाराज शंकर पिंपळकर – पहारेकरी, प्रकाश बापुराव डांगे – पहारेकरी, राजेश फिलीप देवघरे – प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी, प्रमोद महादेव चिवंडे – प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी, गुरुदास पाटील – कंत्राटी कामगार, चंद्रशेखर लहाणुजी खोब्रागडे – कंत्राटी कामगार, दिवाकर बाबुराव सुर्यवंशी – कंत्राटी कामगार, शिलवंत महादेव शंभरकर – कंत्राटी कामगार, सुशील प्रल्हाद शहा – कंत्राटी कामगार, सुनील वासुदेव बोढे, – कंत्राटी कामगार, प्रफुल शांताराम हेलवडे – कंत्राटी कामगार यांचा समावेश आहे.

ह्या भावपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन कल्याण अधिकारी श्री. आनंद वाघमारे यांनी तर उपस्थितांचे आभार श्री.अभय मस्के यांनी मानले.

# चंद्रपूर वीज केंद्राचा ३९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न
## वर्धापन दिनानिमित्त हॅप्पी स्ट्रीटचे बहारदार आयोजन










चंद्रपूर वीज केंद्र हे नवनवीन प्रयोग, विक्रम आणि दिशादर्शक असे केंद्र आहे. वर्तमान परिस्थितीत वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत अनेक आव्हानांमधून मार्ग काढत पुढे जावे लागेल. राज्याच्या एकूण विजेच्या मागणीत चंद्रपूरचा मोठा वाटा असला तरी आगामी काळात सर्व संच जास्तीत जास्त भारांकासह अधिक कार्यक्षमतेने चालवावे लागतील आणि त्यासाठी प्रत्येकाने हा उत्साह वीज उत्पादनाच्या कार्यस्थळी दाखवावा, कारण चंद्रपूरला कुशल मनुष्यबळ, चांगली टीम आणि बेस्ट लीडरशिप असल्याने चंद्रपूर वीज केंद्राकडून अपेक्षा अधिकच वाढल्याचे महानिर्मितीचे मा. संचालक (संचलन-प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर यांनी दि. १७ जानेवारी २०२३ रोजी ऊर्जानगर येथे ३९ व्या वर्धापन दिन समारोपीय समारंभात प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) मा.श्री. पंकज सपाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. संचालक (संचलन-प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, विशेष अतिथी कार्यकारी मा. संचालक (कोळसा) मा.श्री. राजेश पाटील, वेकोलिचे क्षेत्रीय महाव्यवस्थापक श्री. संजय वैरागडे, आभा सिंग तसेच मंचावर मा. मुख्य अभियंते सर्वश्री. राजू घुगे, किशोर राउत, विवेक रोकडे, नारायण राठोड, सेवानिवृत्त मुख्य अभियंता श्री. अनिल आष्टीकर, उप मुख्य अभियंते विजया बोरकर, अनिल पुनसे, श्याम राठोड, सुहास जाधव, मिलिंद रामटेके, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) बाहुबली डोडल, जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, वर्धापन सचिव भास्कर इंगळे, सचिन शेलार प्रामुख्याने उपस्थित होते.

मा.श्री. राजेश पाटील म्हणाले की, "वीज उत्पादनाचे काम खरेतर मलखांबासारखे आहे. कमीत कमी वेळात शरीराच्या प्रत्येक भागाला व्यायाम देणारा हा खेळ प्रकार, क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे, त्याचप्रमाणे वीज उत्पादनात आपल्याला क्षमता विकसित करून कौशल्यासह ध्येयपूर्ती गाठावी लागणार आहे. सध्यस्थितीत चंद्रपूरला महत्तम कोळसा साठा उपलब्ध आहे, त्यामुळे वीज उत्पादनात अधिकाधिक विक्रम नोंदविण्याची संधी उपलब्ध आहे". महानिर्मितीच्या वीज केंद्रांना आवश्यक कोळसा पुरवठा करण्यासाठी वेकोली कटिबद्ध असल्याचे आभा सिंग तसेच संजय वैरागडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले. याप्रसंगी मा. मुख्य अभियंते सर्वश्री. राजू घुगे, विवेक रोकडे, किशोर राऊत,नारायण राठोड,अनिल आष्टीकर यांची समयोचित भाषणे झाली.

अध्यक्षस्थानाहून बोलतांना मा.श्री. पंकज सपाटे म्हणाले की, "९२१ पिशव्या रक्त संकलन, आश्रम शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना वीज केंद्राची ओळख, कोविड निर्भय शिल्प सारखे उपक्रम राबवून चंद्रपूर वीज केंद्राने खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. चंद्रपूर वीज केंद्राकडून असलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आम्ही संकल्प करतोय, त्यामुळे आगामी काळात अपेक्षित बदल दिसून येतील", अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रारंभी लेझीम, बँडपथक तथा सुमधुर स्वागतगीताने मान्यवरांचे जोशपूर्ण स्वागत करण्यात आले. महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगन यांनी व्हिडीओ संदेशातून एकजुटीने काम करून, वीज उत्पादनाचा नावलौकिक कायम ठेवावा असे सांगितले व संपूर्ण टीमला, कुटुंबियांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर इतर मान्यवरांच्या शुभेच्छा संदेशांचे वाचन करण्यात आले. कोविड संसर्गामुळे मृत्युमुखी पडलेल्या ३२ कर्मचाऱ्यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या अभिनव अश्या निर्भय शिल्पाकरिता पंकज सपाटे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

वर्धापन दिनानिमित्त महापूजा, कबड्डी, क्रिकेट, बॅडमिंटन,टेबल टेनिस, लॉन टेनिस, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल, स्केटिंग, कॅरम, ब्रिज, गंमतीशीर खेळ, रस्सी खेच, मॅरेथॉन, बुद्धिबळ, रांगोळी, सुदृढ बालक स्पर्धा, हॅप्पी स्ट्रीट, चित्रकला, हस्तकला, परिसर स्वच्छता, आनंद मेळावा, हौजी, तांत्रिक प्रदर्शनी, महिला मंडळ स्पर्धा रंगारंग कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धा घेण्यात आल्या. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचलन श्री. नासीर खान यांनी केले.

यांप्रसंगी अधीक्षक अभियंते पुरुषोत्तम उपासे, अशोक उमरे, डी.डब्ल्यू. सराग, एस.एम. घोडे, पी.एस. नाखले,डी.वाय. चौधरी, महेश ढोले, महेश राजूरकर, परिमल रामटेके, महेश पराते,दत्तात्रय पिंपळे, उप महाव्यवस्थापक (मासं) अतुल बोरकर, प्र.वैद्यकीय अधीक्षक डॉ. संगीता बोदलकर, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) अविनाश साळवे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी ज्ञानेश्वर ढूमने, विभाग प्रमुख, पुरुष-महिला, मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण अधिकारी श्री. आनंद वाघमारे यांनी तर प्रस्तावना श्री. भास्कर इंगळे यांनी आणि उपस्थितांचे आभार सचिन शेलार यांनी

# चंद्रपूर वीज केंद्राचा ३९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न
## वर्धापन दिनानिमित्त हॅप्पी स्ट्रीटचे बहारदार आयोजन






उन्हाळ्यात शाळेला सुट्ट्या लागल्या की, मामाच्या गावाला जाऊन धमाल मस्ती करायची, गावाकडील निसर्गरम्य मातीशी नातं जोडीत, नात्यांची वीण अधिक घट्ट करायची अशी आपली मराठमोळी संस्कृती. मात्र धकाधकीच्या जीवनात ही जागा टी.व्ही.,मोबाईल, फेसबुक,व्हॉट्सअप सारख्या आभासी दुनियेने व्यापल्याने जीवनाचा खरा–खुरा आनंदच दूर झाला. मानवी जीवन तांत्रिक झाले, यातून उदयास आलेली शहरी संकल्पना म्हणजे 'हॅप्पी स्ट्रीट'. मामाच्या गावाला न जाता सुटीच्या दिवशी सकाळच्या प्रहरी मुख्य रस्त्यावरील रहदारी काही वेळापुरता इतरत्र वळवून त्याठिकाणी मनसोक्त खेळ, धमाल मस्ती करायची, हा यामागचा उद्देश.

महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने दि. १८ जानेवारी २०२३ रोजी ऊर्जानगर वसाहतीतील खुले रंगमंचाच्या सभोवताली रस्त्यावर 'हॅप्पी स्ट्रीट' मामाचं गाव साकारण्यात आले. वीज केंद्राच्या अधिकारी–कर्मचारी व कुटुंबियांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेषत: सुमारे ७००० व्यक्तींनी या कार्यक्रमाचा भरपूर आनंद घेतला.

हिरव्यागार वृक्षांच्या सावलीत, रंगबिरंगी फुगे, झेंडे, तोरणे, टोप्या, कागदी फुलांनी रस्ते आकर्षक सजले होते. सोबतीला मिकी–माउस, कार्टून्स उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते तर वयाचे भान विसरून, आपलं–परकं विसरून, प्रत्येकाने बालपणीच्या खेळाचा निखळ आनंद लुटला. नेहमी चारचाकी चालविणारा बैलबंडी चालवित होता तर माता–भगिनी आपल्या मुलांना विसरून टिक्कर बिल्ला, लगोरी, दोरीवरच्या उड्या, झुले, पाळणे, मामाचं पत्र हरवलं इत्यादी खेळांचा मनसोक्त आनंद घेत होत्या. चार तास कसे संपले कोणालाच कळाले नाही. घराकडे परतीची पाउले वळायला तयार नव्हती एवढा जीव 'हॅप्पी स्ट्रीट' मामाच्या गावाने लावला. एरव्ही घरात बोलायला वेळ नसणारी पालक मंडळी 'हॅप्पी स्ट्रीट' वर एकमेकांशी खुलून बोलताना दिसली तर मुले–मुली देखील आपले आई–वडील टायर, लोखंडी रिंग चालवित धावत असल्याचे पाहून आश्चर्य चकित झाले. अनेकांनी गाणे म्हणून आपले गळे साफ केले. जात–पात, धर्म, वय, पद, गर्व दूर सारून प्रत्येक व्यक्ती स्वत:ला व्यक्त करीत नि:स्वार्थपणे सहभागी झाल्याचे दिसून येत होते. 'हॅप्पी स्ट्रीट' च्या माध्यमातून अखख मामाचं गावच ऊर्जानगरात साकारण्यात आले होते.

अखंडित वीज उत्पादनाचे राष्ट्रीय कार्य करणाऱ्या चंद्रपूर वीज केंद्राच्या अधिकारी–कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी 'हॅप्पी स्ट्रीट' हा उत्तम पर्याय असल्याचे मा. कार्यकारी संचालक मा.श्री. पंकज सपाटे म्हणाले.

या कौटुंबिक कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला त्याचे कारण लहान मुला–मुलींसाठी विविध खेळ, बक्षिसे, बुढ्ढी का बाल (शुगर कँन्डी), जादूचे प्रयोग, बंदुकीच्या गोळीने फुगे फोडणे, दोरीचे झुले, बैलगाडी, गाय–वासरू, घोडा, बकरीचे पिल्लू, बॉल गेम्स, सापशिडी, टायर, लोखंडी रिंग चालविणे, दोरीवरच्या उड्या, लहान सायकल, स्केटिंग, रांगोळी, चित्रकला तर तरुणी व महिलांसाठी मेहंदी, टॅटू, नेल आर्ट, बॅडमिंटन, फुटबॉल, लगोरी, दोरीवरच्या उड्या, कंबर रिंग, प्लेट थ्रो, रबर रिंग, रेखाचित्र, पुरुष वर्गासाठी फुटबॉल, प्लेट थ्रो, बॅडमिंटन, रेखाचित्र, कार्टून्स, कंचे, भवरे इत्यादी उपलब्ध होते. फूड झोनमध्ये इंडियन कॉफी हाउसचे खाद्यपदार्थ, आईस्क्रीम, समोसा, आलूवडा, चहा, चिले, ढोकळा, मोमो, मोड कडधान्ये, भेळ, चना मसाला, पाणीपुरी, नारळपाणी, उकडलेले बोरं अश्या नानाविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. ज्येष्ठ नागरिकांसाठी योगासन, बुद्धिबळ, कॅरम, वृत्तपत्र, मासिके वाचन व संगीत तर मुख्य स्टेजवर डी.जे. संगीत, रेडीओ जॉकीची धमाल कॉमेंट्री, झुम्बा डान्स थरार तर दुसऱ्या मंचावर प्रत्येकाला व्यक्त होण्याची संधी ज्यामध्ये गाणे, नृत्य, मिमिक्री, कविता, वाद्य वाजविणे इत्यादी कला अनेकांनी सादर केल्या.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मा. कार्यकारी संचालक मा.श्री. पंकज सपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली 'हॅप्पी स्ट्रीट' आयोजन समितीच्या सहकार्याने 'हॅप्पी स्ट्रीट' (मामाचं गाव) कार्यक्रम अतिशय यशस्वीरीत्या संपन्न झाला.

कार्यक्रमाला कार्यकारी संचालक पंकज सपाटे, उप मुख्य अभियंते श्याम राठोड, विजया बोरकर, अनिल पुनसे, अधीक्षक अभियंते पुरुषोत्तम उपासे, अशोक उमरे, डी.डब्ल्यू. सराग, एस.एम.घोडे, पी.एस. नाखले, डी.वाय. चौधरी, महेश ढोले, महेश राजूरकर, परिमल रामटेके, महेश पराते, सचिव भास्कर इंगळे, सचिन शेलार, दत्तात्रय पिंपळे, उप महाव्यवस्थापक (मासं) अतुल बोरकर, प्र.वैद्यकीय अधीक्षक डॉ. संगीता बोदलकर, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) अविनाश साळवे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी ज्ञानेश्वर ढूमने, विभाग प्रमुख, पुरुष–महिला, मुले–मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नरेंद्र रहाटे यांनी केले. वर्धापन दिन समितीचे कार्यक्रमाच्या यशस्वितेत 'हॅप्पी स्ट्रीट' आयोजन समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी मोलाची भूमिका बजावली तसेच स्थापत्य, विद्युत, अग्निशमन, सुरक्षा तसेच सर्व विभागांचे मोलाचे सहकार्य लाभले.





# 'मिशन समर्थ' अंतर्गत महानिर्मितीतर्फे जैव इंधन कार्यशाळा पुणे येथे संपन्न

## जैव इंधनाची गुणवत्ता आणि घनता यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे... मा.डॉ. पी. अन्बलगन






महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) तर्फे 'मिशन समर्थ' अंतर्गत आयोजित जैव इंधन कार्यशाळेचे उद्घाटन दि.२८ मार्च २०२३ रोजी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.अन्बलगन यांच्या हस्ते करण्यात आले. बायोमासचा उपयोग करतांना बाष्पकाच्या रचनेनुसार ज्वलन क्षमतेत वाढ करण्यावर आणि जैव इंधनाची गुणवत्ता व घनता यावर लक्ष्य केंद्रित करणे गरजेचे आहे, असे डॉ.पी. अन्बलगन यावेळी म्हणाले.

हॉटेल नोवोटेल येथे आयोजित या कार्यशाळेला महाऊर्जाचे महासंचालक श्री. रवींद्र जगताप, मिशन समर्थचे संचालक श्री. सुदीप नाग, महानिर्मितीचे मा. संचालक सर्वश्री. संजय मारुडकर, दिवाकर गोखले, अभय हरणे, कार्यकारी संचालक सर्वश्री. राजेश पाटील, डॉ. नितीन वाघ, नितीन चांदूरकर, मुख्य अभियंते सर्वश्री. राजेशकुमार ओसवाल, अंकुश नाळे, पंकज नागदेवते, प्रफुल्लचंद्र डोंगरे आदी उपस्थित होते.

डॉ.पी. अन्बलगन म्हणाले, "महाराष्ट्राचे सर्वच क्षेत्रात लक्षणीय योगदान आहे. बायोमास पॅलेटच्या वापराच्या क्षेत्रातही राज्यात मोठी संधी आहे. बाष्पकासाठी कोळशाचा तुटवडा आणि विद्युत ऊर्जेची वाढती मागणी लक्षात घेता बायोमासचा उपयोग महत्वाचा आहे. जैव इंधनाचा वापर करणे व पर्यावरणपूरक वीज निर्मितीला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने भारत सरकार विद्युत मंत्रालयाच्या सूचनेनुसार 'मिशन समर्थ' अंतर्गत औष्णिक वीज केंद्रात कोळश्यासोबत किमान ५ टक्के इतक्या प्रमाणात बायोमास पॅलेट इंधनाचा मिश्रित वापर करण्याचे निर्देश" असल्याचे त्यांनी सांगितले.

आगामी काळात महानिर्मितीच्या औष्णिक वीज केंद्रास बायोमास इंधन पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन त्यासाठी शेतकरी, लघु व मध्यम उद्योजक यांची एक दीर्घकालीन पुरवठा साखळी व्यवस्था स्थानिक पातळीवर तयार होऊन त्यायोगे कृषी व लघुमध्यम उद्योग क्षेत्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळावी असा प्रयत्न केला जाणार आहे.

महासंचालक श्री. रवींद्र जगताप म्हणाले, "शेतकऱ्यांच्या हिताचा हा विषय असल्याने त्याचा क्षेत्रीय अभ्यास होणे गरजेचे आहे. पॅलेट उत्पादनात शेतकऱ्यांनी पुढे यावे. यासाठी शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून प्रोत्साहन देणेही गरजेचे आहे. महाराष्ट्रात २०३० पर्यंत ३५ ते ४० हजार मेगावाट विजेची मागणी राहू शकते, त्यापैकी ३० टक्के नवीकरणीय ऊर्जेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी योग्य नियोजन करावे लागेल. प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवर भेट देऊन वास्तव परिस्थिती जाणून घ्यावी लागेल. स्थानिक स्तरावरील लहान प्रयोगांना प्रोत्साहित करावे लागेल", असे त्यांनी सांगितले.













## ‘मिशन समर्थ’ अंतर्गत महानिर्मितीतर्फे जैव इंधन कार्यशाळा पुणे येथे संपन्न








मिशन समर्थचे संचालक श्री. सुदीप नाग म्हणाले की, “शेतीत जैव इंधन जाळल्याने मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. पीक काढल्यानंतर शेत पुन्हा तयार करण्याची ही स्वस्त आणि सुलभ पद्धत आहे. हे प्रदूषण कमी करण्यासाठी जुलै २०२१ मध्ये ‘मिशन समर्थ’ सुरू करण्यात आले. कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे हे या मिशनचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. बायोमासच्या उपयोगाने आत्ताच्या पायाभूत सुविधेच्या साहाय्याने वीजनिर्मिती करणे शक्य आहे. मिशनच्या माध्यमातून पेलेट उत्पादकांना त्याच्या उपयोगाची शाश्वती देण्यात येऊन प्रोत्साहनही देण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी सहकाराच्या माध्यमातून बायोमास एकत्रित करणे आणि पॅलेट तयार करून उत्पन्न वाढवावे. महाराष्ट्रात ८२ दशलक्ष मे. टन कृषी उत्पादन होते. त्यापैकी ५२ दशलक्ष मे. टन बायोमास उपलब्ध होते. घरगुती व इतर उपयोग वजा जाता २१ दशलक्ष मे.टन बायोमास पेलेट उत्पादनासाठी उपयोगात आणणे शक्य आहे. उद्योजक आणि शेतकऱ्यांनी याबाबत विचार करावा”, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक मा. संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी केले. जैव इंधनाशी संबंधित सर्व घटकांना एकत्रित आणून बायोमास पेलेट इंधनाचा वापर वीजनिर्मितीत करण्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण रक्षणासाठी महानिर्मितीतर्फे प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

जैव इंधन क्षेत्राशी संबंधित तंत्रज्ञान, संधी, आव्हाने, संशोधन, बाजारपेठ विश्लेषण आणि कर्ज उपलब्धतेवर या कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. कार्यक्रमस्थळी जैव इंधन विषयाशी संबंधित माहिती देणारे विविध स्टॉल्स देखील प्रदर्शित करण्यात आले. कार्यशाळेला शेतकरी, पॅलेट उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, लघु/मध्यम उद्योजक प्रतिनिधी, महानिर्मितीचे अन्य वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते.








## ‘मिशन समर्थ’ अंतर्गत महानिर्मिती आयोजित जैव इंधन कार्यशाळा पुणे येथे संपन्न








उपस्थितांना बहुमोल मार्गदर्शन करताना आदरणीय मान्यवर



जैव इंधन क्षेत्राशी संबंधित तंत्रज्ञान, संधी, आव्हाने, संशोधन, बाजारपेठ विश्लेषण आणि कर्ज उपलब्धतेवर सदर कार्यशाळेत चर्चा करताना







संपादक : यशवंत मोहिते (जनसंपर्क अधिकारी)

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. (खाजगी वितरणासाठी)

**E-mail :** pro@mahagenco.in
**Web. :** www.mahagenco.in
Printed & Published by : Shri. Yashwant Mohite for
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.
**The Company accepts no responsibility for the matter published in the journal.**